अहवाल क्रमांक : १८७

सत्यमेव जयते

# पंचायती राज समिती

## (२०२०-२०२१)

## (चौदावी महाराष्ट्र विधानसभा)

**महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या रायगड जिल्हा परिषदेच्या सन २०१३-२०१४ च्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदांबाबत**

**व**

**रायगड जिल्हा परिषदेच्या सन २०१४-१५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात**

# आठवा अहवाल

(सदर अहवाल दिनांक मार्च, २०२१ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
२०२१

# पंचायती राज समिती

## (२०२०-२०२१)

## (चौदावी महाराष्ट्र विधानसभा)

**महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या रायगड जिल्हा परिषदेच्या सन २०१३-२०१४ च्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदांबाबत**

**व**

**रायगड जिल्हा परिषदेच्या सन २०१४-१५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भातील**

# आठवा अहवाल

## पंचायती राज समिती
## (सन २०२०-२०२१)

**समिती प्रमुख**

(१) श्री. संजय रायमुलकर, वि.स.स. तथा समिती प्रमुख,

**सदस्य**

(२) श्री. प्रदिप शिवनारायण जैस्वाल, वि.स.स.

(३) श्री. कैलास बाळासाहेब पाटील (घाडगे), वि.स.स.

(४) डॉ. राहूल वेदप्रकाश पाटील, वि.स.स.

(५) श्री. अनिल भाईदास पाटील, वि.स.स.

(६) श्री. संग्राम अरूणकाका जगताप, वि.स.स.

(७) श्री. दिलीपराव शंकरराव बनकर, वि.स.स.

(८) श्री. शेखर गोविंदराव निकम, वि.स.स.

(९) श्री. सुभाष रामचंद्रराव धोटे, वि.स.स.

(१०) श्री. माधवराव निवृत्तीराव जवळगावकर, वि.स.स.

(११) श्रीमती प्रतिभा सुरेश धानोरकर, वि.स.स.

(१२) श्री. हरीभाऊ किसनराव बागडे, वि.स.स.

(१३) डॉ. विजयकुमार कृष्णराव गावीत, वि.स.स.

(१४) डॉ. देवराव मादगुजी होळी, वि.स.स.

(१५) श्री. कृष्ण धमाजी गजबे, वि.स.स.

(१६) डॉ. संजय श्रीराम कुटे, वि.स.स.

(१७) श्री. राणा जगजितसिंह पाटील, वि.स.स.

(१८) श्री. प्रशांत बंसीलाल बंब, वि.स.स.

(१९) श्रीमती मेघना दिपक बोर्डिकर-साकोरे, वि.स.स.

(२०) श्री. किशोर गजानन जोरगेवार , वि.स.स.

(२१) श्री. अंबादास दानवे, वि.प.स.

(२२) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(२३) श्री. अमरनाथ राजुरकर, वि.प.स.

(२४) श्री. निरंजन डावखरे, वि.प.स.

(२५) श्री. सुरेश धस, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

(२६) श्री. किशोर आप्पा पाटील, वि.स.स.

(२७) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

(२८) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(२९) श्री. किशोर दराडे, वि.प.स.

(३०) श्री. रत्नाकर गुट्टे, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. राजेंद्र भागवत, सचिव

(२) श्री. विलास आठवले, उप सचिव

(३) श्री. रंगनाथ खैरे, अवर सचिव (समिती)

(४) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

(५) श्रीमती सुषमा लोंढे, कक्ष अधिकारी.

# पंचायती राज समिती
## (सन २०१७-२०१८)

**समिती प्रमुख**

१. श्री. सुधीर पारवे, वि.स.स.

**सदस्य**

२. श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

३. श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

४. श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

५. ॲड. राहुल कुल, वि.स.स.

६. श्री. आर.टी.देशमुख, वि.स.स.

७. डॉ.देवराव होळी, वि.स.स.

८. *** रिक्त

९. डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.

१०. श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

११. श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

१२. श्री. किशोर पाटील, वि.स.स.

१३. श्री. राजेश क्षीरसागर, वि.स.स.

१४. श्री. तुकाराम काते, वि.स.स.

१५. श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.

१६. श्री. भारत भालके, वि.स.स.

१७. प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

१८. श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

१९. श्री. राहुल मोटे, वि.स.स.

२०. श्री. दीपक चव्हाण, वि.स.स.

२१. श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.

२२. *** रिक्त

२३. श्री. विक्रम काळे, वि.प.स.

२४. श्री. सतीश चव्हाण, वि.प.स.

२५. श्री. अमरनाथ राजूरकर, वि.प.स.

**विशेष निमंत्रित :**

२६. श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

२७. श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

२८. श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

२९. श्री. किशोर दराडे, वि.प.स.

३०. *** श्री. निलय नाईक, वि.प.स.

३१. *** श्री. निरंजन डावखरे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. जितेंद्र भोळे, सचिव (कार्यभार)

(२) श्री. विलास आठवले, सह सचिव (२) (का.)

(३) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(४) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

(५) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी

* श्री. किशोर दराडे, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून दिनांक ४ डिसेंबर, २०१८ रोजीपासून नामनियुक्ती केलेली आहे.

** श्री. निलय नाईक, वि.प.स. व श्री. निरंजन डावखरे, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून दिनांक १ मार्च २०१९ रोजीपासून नामनियुक्ती केलेली आहे.

*** श्री. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स. व प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स. यांचा दिनांक १६ जून, २०१९ रोजी मंत्री परिषदेत समावेश झाल्यामुळे रिक्त

**प्रस्तावना**

मी, पंचायती राज समितीचा “समिती प्रमुख” या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरून पंचायती राज समितीचा आठवा अहवाल सादर करीत आहे.

सन २०२०-२०२१ या वर्षाकरिता समिती दिनांक १३ जानेवारी, २०२१ रोजी गठीत झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुर्नविलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय महसुली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

शासनाच्या विविध कामकाजाचा वाढलेला व्याप (Enormous range and complexity) लक्षात घेता विधानमंडळाला उपलब्ध वेळेत आपली कर्तव्ये पुरेशा क्षमतेने बजावता येणे अशक्य झाले आहे. शासन यंत्रणेकडे उक्त किचकट प्रशासकीय कामासाठी सक्षम व तज्ज्ञ प्रशासक यंत्रणा उपलब्ध असते. संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण, प्रभावी व अर्थपूर्ण असे (effective meaningful) नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन (Executive) राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी (Tone of administration) मा.सभापती, विधानपरिषद व मा.अध्यक्ष, विधानसभा यांनी दोन्ही सभागृहाच्या निवडक सदस्यांचा समावेश असलेल्या पंचायती राज समितीचे गठन दिनांक १३ जानेवारी, २०२१ रोजी केले. समिती पद्धतीचे वैशिष्ट असे की, सभागृहात पक्षीय ध्येयधोरणांचा सदस्यांवर प्रभाव पडतो. त्या उलट संसदीय लोकशाही पद्धतीमध्ये विधानमंडळाची ही समिती फार मोठ्या मोलाचे कार्य पार पाडीत आहे. ही समिती विधानमंडळाची निर्मिती असून ती साहजिकच विधानमंडळास दुय्यम आहे. या समितीला सर्व अधिकार विधानमंडळापासूनच प्राप्त झालेले आहेत. (They derive authority from the Legislature) या समितीला “Mini Legislature” सभागृहाची छोटी प्रतिकृती संबोधली जाते. शासनाने राबविलेल्या योजनांच्या अंमलबजावणीला पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी व प्रशासनावर सातत्याने नियंत्रण व प्रभावीपणे पहारा ठेवण्याचे महत्त्वाचे काम विधानमंडळाच्या या समितीद्वारे केले जाते. समितीचे कामकाज पक्षविरहीत तत्त्वावर (irrespective of party affiliation) चालत असल्यामुळे समिती समोरील बाबी पक्षीय अभिनिवेशरहीत पद्धतीने (Non-Party Basis) विचारात घेण्यात येतात त्यामुळे एखाद्या विषयाचा अभ्यास अत्यंत नि:पक्षपातीपणे व तपशिलात जाऊन केला जातो. परिणामी त्यास पूर्ण न्याय मिळतो.

शासनाचे एखादे धोरण वा योजना याची आखणी कशी करावी याबाबत समिती सल्ला देऊ शकणार नाही, तथापि शासनाने अंमलात आणलेल्या धोरणांची वा योजनेची फलश्रुती अपेक्षेप्रमाणे होत नसेल वा होणार नसेल तर ही बाब संबंधित समिती सभागृहाच्या नजरेस आणून त्या धोरणात वा योजनेत बदल करण्यासंबंधी शासनास सुचविण्याचे काम करते. समिती पद्धतीचा हा एक विशेष फायदा आहे.

विधिमंडळाप्रती शासनाची जबाबदारी ही मर्यादित स्वरूपाची आहे. संसदीय लोकशाहीमध्ये शासन हे प्रत्येक बाबतीत विधानमंडळाला सर्वतोपरी जबाबदार असते आणि शासनाच्या संपूर्ण प्रशासनावर विधीमंडळाचे नियंत्रण हा संसदीय लोकशाहीचा आत्मा आहे.

समितीचे अधिकार, कार्यकक्षा, प्रशासनावर ठेवावयाचे नियंत्रण, शासनाचे समितीप्रती व विधानमंडळाप्रती असलेले उत्तरदायित्व या सर्वांचा साकल्याने विचार केल्यास समितीचे अधिकार निश्चित व निर्विवादपणे सर्वश्रेष्ठ आहेत. परंतु, योजना राबविण्यापूर्वी वा एखादे धोरण आखण्यापूर्वी प्रशासन यंत्रणेने मंत्रिमंडळाला दिलेल्या सल्ल्याची तपासणी करणे निश्चितच समितीच्या कार्यकक्षेबाहेरील होईल. मात्र योजना अस्तित्वात आल्यानंतर व त्यावर आर्थिक तरतूद करण्यात आल्यानंतर समिती या प्रकरणी संपूर्णपणे व तपशिलवार छाननी करण्यास समर्थ ठरेल. ही योजना अगदी अनावश्यक आहे काय, त्यावर अपेक्षेपेक्षा जास्त खर्च करण्यात आला आहे काय ? योजनेची उद्दीष्टे साध्य झाली आहेत काय ? योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम आहे किंवा कसे, इतकेच काय एखादी योजना आर्थिकदृष्ट्या सक्षम नसल्यास ती बंद करण्यात यावी व त्याऐवजी दुसरी एखादी योजना आखण्यात यावी या मर्यादेपर्यंत सुद्धा समिती शिफारस करू शकते व त्या अनुषंगाने आवश्यक ती सर्व माहिती समितीला मागविण्याचा अधिकार आहे.

समित्यांचे कामकाज अधिक परिणामकारक करण्यासाठी मा.सदस्यांनी समितीच्या कामात जास्तीत जास्त सहभाग घेणे जरुरीचे आहे. या अहवालात नमूद बाबीसंदर्भात समितीने एक एक प्रश्न हाती घेऊन त्या प्रत्येक प्रश्नावर समाधानकारकरीतीने साक्षीपुरावा गोळा केला, तसेच मा. समिती सदस्यांनी आळीपाळीने प्रश्न विचारून संबंधित अधिका-यांकडून माहिती मिळविण्याच्या विनिर्दिष्ट पद्धतीचे पालनसुद्धा भेटीच्या वेळी केलेले आहे. एका सदस्यांनी त्यांचा मुद्दा पूर्ण केल्यानंतरच दुस-या सदस्यांनी माहिती विचारण्याची पद्धत जोपासली आहे. या पद्धतीने समितीचे कामकाज सुव्यवस्थित पद्धतीने चालविण्याचा या समितीने प्रयत्न केलेला आहे.

समितीला तिच्याकडे सोपविण्यात आलेल्या विषयावरील मुद्दे तयार करून आणि त्यांच्या विनिर्दिष्ट क्रमाने त्यांचे परिक्षण करून विषयाशी संबंधित नियम किंवा कार्यपद्धतीमधील त्रुटी आणि उणीवा शोधून काढतेवेळी समितीचा दृष्टीकोन वस्तुनिष्ठ व विधायक होता. केलेल्या चुका सुधारण्यासाठी किंवा प्रशासकीय पद्धतीत सुधारणा घडविण्याच्यादृष्टीने समितीने अनेक बाबतीत सुधारणात्मक उपाय सुचविलेले आहेत, चुकांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी देखील समितीने उपाययोजना सुचविलेल्या आहेत. शासनाच्या प्रतिनिधीप्रती सदस्यांचे वर्तन संयमी आणि सौजन्यशील ठेवून कोणताही साक्षीदार काही वस्तुस्थिती लपवित असल्याबद्दल दोषी असल्याचे किंवा असहकार दर्शवित असल्याचे आढळून आल्यानंतर समितीने संबंधितांविरुद्ध कारवाईदेखील सुचविली आहे. समितीची बैठक बोलविणे आणि साक्षीदारांना साक्षीसाठी बोलविणे यासंबंधीच्या इतर किरकोळ मुद्द्यांच्या बाबतीत साक्षीदारांना पुरेसा वेळ देऊन व नोटीस देऊन बोलविण्यात आलेले आहे. थोडक्यात, समिती पद्धती ही अत्यंत उपयुक्त व परिणामकारक असून संसदीय कामकाज प्रणालीमध्ये या पद्धतीचे स्थान व महत्त्व अनन्यसाधारण असेच आहे. संसदीय शासन प्रणाली अधिकाधिक वृद्धिंगत करण्याच्या दृष्टीने या महत्त्वपूर्ण अशा संसदीय समितीच्या कामकाजाचा स्तर उत्तरोत्तर उंचावत नेणे ही आपणा सर्वांची जबाबदारी आहे.

राज्यात समिती जिल्हा परिषदांना भेटी देत असताना समितीला अनेक चांगल्या संकल्पना व राबविलेल्या योजना आढळून आल्या आहेत. त्याचप्रमाणे काही बाबतीत प्रचंड अनियमितता व गैरव्यवहाराची प्रकरणेदेखील आढळून आली आहेत. समितीने चांगल्या बाबींना समर्थन देऊन संबंधितांना प्रोत्साहन दिले. तद्वतच काही अनियमितता किंवा गैरव्यवहाराच्या प्रकरणात समितीने कठोरपणे निर्णयदेखील घेतले आहेत. असे करीत असताना दोषारोपित व्यक्तीवर कारवाई करताना नैसर्गिक न्यायाची पायमल्ली होऊ नये अशा प्रकारच्या सूचनादेखील प्रशासनास केल्या आहेत. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून न देणे अशी असंख्य प्रकरणे समितीला आढळून आली. अशा प्रकरणी समितीने कोणताही मुलाहिजा न ठेवता संबंधितांवर मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियमातील तरतुदीनुसार दंडात्मक कारवाईदेखील प्रस्तावित केली आहे. या माध्यमातून शासनखाती दंडाची रक्कम जमा होत असताना संबंधित कर्मचा-यांना जरबदेखील बसविण्याचे काम समितीने केले आहे.

या समितीने ज्या ज्या जिल्ह्यांना भेटी दिल्या आहेत त्या त्या जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांना भेटी देऊन उक्त पंचायत समित्यांच्या प्रशासनिक अहवालावर सखोल चर्चा करून ज्या बाबतीत दोष आहेत त्या सुधारून घेण्याबाबत त्यांना उपयुक्त सूचना केल्या आहेत. तसेच पंचायत समित्यांच्या क्षेत्रातील विविध कामांना भेटी देऊन त्याची पाहणी करणे, शालेय पोषण आहार, पुरक पोषण आहार, सार्वजनिक आरोग्य केंद्रे/उपकेंद्रे, पशु वैद्यकीय दवाखाने, रस्ते, जलसिंचनाची कामे, पाणीपुरवठ्याची कामे इत्यादींना भेटी देऊन त्याबाबतही चुकांचे निरसन करून काही चांगल्या बाबींचे समर्थन करून संबंधितांना प्रोत्साहितदेखील केले आहे. या अहवालात अशा अनेक बाबींचा उहापोह केला आहे.

सन २०१२-१३ या वर्षाच्या लेखा परीक्षा पुर्नविलोकन व सन २०१३-१४ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात सन २०१७-१८ साठी गठीत झालेल्या समितीने रायगड जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली. समितीने रायगड जिल्हा परिषदेस दिनांक २३, २४ व २५ ऑक्टोबर, २०१८ रोजी भेट देऊन श्री. अभय यावलकर मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांची साक्ष घेतली.

सन २०१७-२०१८ या वर्षाकरिता गठीत झालेल्या समितीने रायगड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या तसेच साक्षीच्या वेळी संबंधित अधिका-यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्द्यांबाबत अधिक माहिती जाणून घेण्याच्या दृष्टीने दिनांक २८ ऑगस्ट, २०१९ रोजी जिल्हा परिषद, रायगड संदर्भात मंत्रालयीन विभागीय सचिवांच्या/प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचेवेळी डॉ. प्रदिप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, श्री.अनिल डिग्गीकर, प्रधान सचिव, पर्यावरण विभाग, श्री.विरेन्द्र तिवारी, अतिरिक्त प्रधान मुख्य वन संरक्षक, महसूल व वन विभाग, श्री. एन.वासुदेवन, अतिरिक्त प्रधान मुख्य वन संरक्षक, वन कक्ष, श्री.र.अ. नागरगोजे, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. राजेंद्र पवार, उप सचिव, शालेय शिक्षण विभाग, श्री.गिरीष भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग, श्री. आ.प्र.पाटील, अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग, डॉ. विजय भुंदेवाड, सहसंचालक, आरोग्य सेवा संचालनालय, श्री. दिलीप हळदे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड, श्री.अभय यावलकर, मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड, श्री.रणधीर सोमवंशी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, रायगड, श्री. निखिलकुमार ओसवाल, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, श्रीमती शितल पुंड, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री. पुंडलिक साळुंके, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, पाणीपुरवठा व स्वच्छता, श्री. एन.जी.मंडलिक, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, बालकल्याण, श्री.सु.रा.भोसले, संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा संचालनालय, नवी मुंबई, श्री.दत्तात्रेय पाथरूट, मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांची आभारी आहे. तसेच जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर संबंधित अधिकारी यांनी साक्षीच्या वेळी समितीला माहिती पुरवून केलेल्या सहकार्याबद्दल समिती त्यांचीही आभारी आहे.

समितीने कामकाजाचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्टामध्ये दिले आहे.

लेख्यांवरील लेखापरिक्षा पुनर्विलोकन  व वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात समितीने भेटी दिलेल्या रायगड जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्द्यांबाबत समितीचे अभिप्राय व शिफारशी अहवालात देण्यात आल्या आहेत.

सन २०२०-२०२१ साठी नव्याने गठीत झालेल्या समितीने दिनांक ३ मार्च, २०२१ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेऊन तो किरकोळ दुरुस्तींसह संमत केला.

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ३ मार्च, २०२१.

**संजय रायमुलकर**
समिति प्रमुख,
पंचायती राज समिती

## अनुक्रमणिका (अ)

## रायगड जिल्हा परिषदेच्या सन २०१३-१४ च्या लेख्यांवरील लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवाल


| अ.क्र. (१) | प्रकरण क्रमांक (२) | विषय (३) | परिच्छेद क्रमांक (४) | पृष्ठ क्रमांक (५) |
|---|---|---|---|---|
| (१) | एक | जिल्हा परिषद मधील गट “क” व गट “ड” संवर्गाची रिक्त पदे भरण्यासाठी केलेल्या खर्चाबाबत (सन २०१३-१४) | ३.२ | १ |
| (२) | दोन | पर्यावरण ग्रामसमृध्दी योजनेतील अनियमिततेबाबत (सन २०१३-१४) | ३.३ | ४ |
| (३) | तीन | प्राथमिक आरोग्य केंद्राच्या औषधी अनुदानात वाढ (ओ.टी.एस.पी) (सन २०१३-१४) | ३.७३९ | ७ |
| (४) | चार | वाहनाच्या लॉग बुकातील अनियमितता (सन २०१३-१४) | ३.७४१ | १० |
| (५) | पाच | शालेय पोषण आहार योजनेपासून लाभार्थी वंचित ठेवणेबाबत(सन २०१३-१४) | ४.१०२/ ४.१०५/ ४.१०६ | १२ |
| (६) | सहा | घोडगांव, चिखलगांव अंगणवाडी बांधकाम करण्यातील अनियमितता (सन २०१३-१४) | ४.६९७ | १८ |
| (७) | सात | सर्वसाधारण शिफारशी | | २१ |

## रायगड जिल्हा परिषदेच्या सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवाल

अनुक्रमणिका (ब)


| अ.क्र. (१) | प्रकरण क्रमांक (२) | विषय (३) | पृष्ठ क्रमांक (४) |
|---|---|---|---|
| (१) | एक | समितीने रायगड जिल्हा परिषदेला भेट दिली असता रायगड जिल्हयातील लोकप्रतिनिधी व जिल्हा परिषदेच्या पदाधिका-यांसोबत केलेल्या अनौपचारिक चर्चेच्या वळी समितीच्या निदर्शनास आलेल्या बाबीसंदर्भात | २४-२६ |
| | | परिशिष्ट<br>समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त | २७-३९ |

प्रकरण एक

## जिल्हा परिषद, रायगड

## जिल्हा परिषद मधील गट "क" व गट "ड" संवर्गाची रिक्त पदे भरण्यासाठी केलेल्या खर्चाबाबत

### परिच्छेद क्रमांक ३.२ (सन २०१३-१४)

जिल्हा परिषद, रायगड सन २०१३-१४ (परिच्छेद क्र.१) याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेतः—

(१) भरती प्रकियेची अंमलबजावणी करण्याकरिता खाजगी एजन्सी नियुक्त करण्याबाबत स्पष्ट सूचना दिसून येत नाहीत. असे स्पष्ट असतांना देखील याबाबत निर्णय घेण्यात आलेला नाही.

(२) सामान्य प्रशासन तथा जिल्हा निवड समिती, जिल्हा परिषद, रायगड यांचे पत्र क्रमांक आस्था- २/२०१३, दिनांक १० मे, २०१३ अन्वये आय.बी.पी.एस या एजन्सीला भरती प्रकिया राबविण्याकरिता व कार्यपद्धतीकरिता एजन्सी म्हणून नियुक्त केले आहे.

(३) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रनिमं २००७/ प्र.क्र.४६/०७/१३ अ, दिनांक १९ ऑक्टोबर, २००७ व महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. प्रनिमं २००७/प्र.क्र.४६/०७/१३ अ, दिनांक २७ जून, २००८ नुसार

(१) वरील दोन शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात आलेली नाही.

(२) शासन निर्णयानुसार एजन्सी नेमण्यात आली त्याचा खुलासा केला नाही व शासन निर्णयाची प्रत किंवा शासनाचे मंजुरी आदेशाची प्रत उपलब्ध करून देण्यात आली नाही.

(४) जिल्हा परिषद, रायगड मध्ये सन २०१३ ची भरती प्रक्रिया करण्यापूर्वी मंत्रालयीन प्रशासकीय विभागाने आय.बी.पी.एस संस्थेला मान्यता दिली होती का? अशी मान्यता असल्यास, त्याची प्रत सादर केलली नाही.

(५) भरती प्रक्रिया २०१३ ची नस्तीमध्ये वरील लेखे नसल्यामुळे अर्धसमास पत्र देऊन खुलासा किंवा लेखे उपलब्ध केलेले नाहीत, त्यामुळे भरती प्रक्रियेवर खर्च रुपये १३,०९,५५५/- असल्याची खात्री होत नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितील जिल्हा परिषद, रायगड यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आलाः—**

(१) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक प्रनिमं २००७/ प्र.क्र.४६/०७/१३ अ, दिनांक १९ ऑक्टोबर, २००७ अन्वये भुतपूर्व दुय्यम सेवा निवड मंडळाच्या कक्षातील गट क वर्गीय पदांकरिता उमेदवाराची निवड करण्यासाठी जिल्हा स्तरीय पदांकरिता जिल्हा निवड समिती स्थापन करण्यात आली आहे. त्यानुसार जिल्हा निवड समितीने आय.बी.पी.एस. ही संस्था बँकींग भरती प्रकियेसह विविध क्षेत्रात भरती प्रकियेचेच काम करीत असल्याने IBPS या संस्थेची नियुक्ती केली आहे.

(२) होय.

(३) ३ (१) व ३ (२) बाबत-उपरोक्त निर्णयानुसार भरती प्रक्रिया जिल्हा निवड समितीने राबविलेली आहे.

(४) सदर भरती प्रक्रियेच्या अनुषंगाने मंत्रालयीन प्रशासकीय विभागाने आ. बी. पी. एस. संस्थेला मान्याता दिल्याचे अभिलेख नस्तीस आढळून येत नाही.

(५) सदर भरती प्रक्रिया पार पाडण्यासाठी रक्कम रुपये १३,०९,५५५/- एवढा खर्च झाल्याने केलला खर्च मान्य होणेस विनंती आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

रायगड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २३ ऑक्टोबर, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने जिल्हा परिषदेतील गट "क" व गट "ड" संवर्गाची रिक्त पदे भरण्यासाठी केलेल्या खर्चाबाबत विचारणा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, ही रक्कम त्या त्या विभागाच्या खाते प्रमुखांच्या खात्यावर जमा करण्यात आलेली आहे. यावर समितीने विचारणा केली की, उमेदवारांची निवड करण्यासाठी जिल्हास्तरिय निवड समिती स्थापन करण्यात आली होती. त्यानंतरही आपण आय.बी.पी.एस. या संस्थेमार्फत भरती प्रक्रिया केलेली आहे. याकरिता शासनाची मान्याता न घेण्याचे काय कारण आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, ही समिती जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली होती, त्याअंतर्गत ही कार्यवाही झालेली आहे.

तदनंतर समितीने विचारण केली की, शासनाची सर्व पदे भरायची होती. याकरिता लागणारा पैसा जिल्हा परिषदेमधून खर्च केलेला आहे आपण लेखी उत्तरामध्ये दिलेले आहे की, याकरिता मान्यता घेण्यात आलेली आहे. परंतु कोणाची मान्यता घेण्यात आलेली आहे. आकृतीबंधाकरिता लागणारा खर्च जिल्हा परिषदेच्या सेसे फंडातून खर्च केला जात नाही. हा निधी या कामाकरिता कसा खर्च करण्यात आला, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, या भरतीमध्ये १९ संस्थेमधील ९३ पदे आणि १० संस्थेमधील ११५ पदे भरण्यात आलेली आहेत. याचा काही खर्च आपल्याला प्राप्त झाला होता व इतर खर्च सेस निधीतून खर्च करावा लागला.

यावर समितीने विचारणा केली की, किती योजना आल्या व त्या योजनांवर किती निधी खर्च झाला, तसेच हा निधी सेस फंडातून घेण्याची कारणे काय आहेत. तसेच आयबीपीएस या संस्थेला मान्यता असल्याचे आढळून येत नाही. यावर तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, त्यावेळी तत्कालिन जिल्हाधिकारी यांनी सूचना दिल्या होत्या की, आयबीपीएस ही केंद्र शासनाची संलग्न संस्था आहे. ही संस्था अनेक वर्षापासून भरती प्रक्रिया राबविते. कर्मचा-यांची संवेदनशीलता व कर्मचा-यांची सचोटी जास्ती जास्त होती, तसेच भरतीमध्ये पारदर्शकता राहील, गैरप्रकार होणार नाही, या हेतूने हे काम आयबीपीएस या संस्थेला देण्यात आले होते. यावर समितीने तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विचारणा केली की, आयबीपीएस ही संस्था पारदर्शकतेने काम करणारी होती तर आपण शासनाची मान्यता का घेतली नाही. यावर तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, ही संस्था केंद्र शासनाची संलग्न संस्था आहे. तसेच रिॲप्रोप्रिएशनमध्ये दिनांक २२ ऑगस्ट, २०१३ रोजी सभा झाली होती. त्यावेळी जिल्हा परिषदेची मान्यता घेण्यात आली होती.

यावर समितीने विचारणा केली की, जिल्हा परिषदेने ठराव केला असे आपण सांगत आहात. परंतु तुम्हाला एखाद्या कर्मचा-याला निलंबित करायचे असेल तर त्याकरिता विभागीय आयुक्तांची परवानगी घेता परंतु भरती प्रक्रिया राबवताना भरतीचे काम कोणाकडे द्यायचे याबाबत आयुक्तांची परवानगी घेतली नाही. त्यामुळे याबाबत तुम्ही शासनाची फसवणूक केलेली आहे. हा आक्षेप जिल्हा परिषदेवर जात आहे अशी नाराजी व्यक्त करून संबंधितांना पुढील प्रमाणे निदेश दिले की, मुख्य कार्यकारी अधिका-यांनी परीक्षा फी म्हणून अनेक उमेदवारांकडून पैसे वसूल केले आहेत. असे असतांना सेस फंडातून पैसे घेऊन आयबीपीएस कंपनीला देणे, जिल्हाधिका-यांनी आपल्या कक्षेत कंपनीस मान्यता दिली आहे. शासनाची मान्यता घेणे आवश्यक असताना तसे घडलेले नाही, त्यामुळे याची सखोल चौकशी करून अहवाल तयार करावा. अनुदान केव्हा आले, किती निधी उपलब्ध झाला याची माहिती समितीला सादर करावी, सचिव स्तरावर क्लॅरिटी येण्यासाठी आणि शासनामार्फत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यासाठी विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली:-**

जिल्हा परिषदेतील गट क व गट ड संवर्गाची रिक्त पदे भरण्यासाठी मुख्य कार्यकारी अधिका-यांनी परीक्षा फी म्हणून अनेक उमेदवारांकडून पैसे वसूल केलेले असतांनाही जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून पैसे काढून ते आय. बी. पी.एस. कंपनीला देणे, शासनाने मान्यता देणे आवश्यक असतांना जिल्हाधिका-यांनी त्यांच्या अधिकार कक्षेत मान्यता देणे, या प्रकरणी करण्यात आलेल्या सखोल चौकशीमध्ये काय आढळून आले व याकरिता किती निधी उपलब्ध झाला, यासंदर्भात सचित स्तरावर स्पष्टता येण्यासाठी आणि शासनामार्फत मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्यासाठी कोणती कार्यवाही करण्यात आली आहे ?

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली:–**

शासन निर्णय क्र. प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३ द्वअ, दिनांक १९ ऑक्टोबर, २००७ मधील मुद्दा क्र. ११ मध्ये नमुद केल्यानुसार निवड प्रक्रियेच्या कामाकरिता होणा-या खर्चासाठी विभागप्रमुख/ प्रादेशिक विभागप्रमुख, जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयाच्या अंदाजपत्रकात तरतूद करावी व मंजूर केलेल्या अनुदानातून खर्च भागविण्यात यावा असे नमूद आहे. परीक्षेसाठी जिल्हा परिषद सेस मधून भरती प्रक्रियेकरिता सन २०१३-१४ पुनर्विनियोजनाद्वारे रक्कम रुये १३,००,०००/- तरतूद करणेत आली व आयबीपीएस कंपनीला परीक्षा प्रकिया राबविणेकरिता रक्कम रुपये १३,०९,५५५/- एवढा खर्च भागविण्यात आला.

शासन निर्णय दिनांक १९ ऑक्टोबर, २००७ व शासन निर्णय क्र. प्रानिमं-२००७/प्र.क . ४६/०७/१३-अ, दिनांक २७ जून, २००८ मध्ये खाजगी कंपनी अथवा बाह्यस्थ संस्थेकडून परीक्षा प्रक्रिया राबविता येईल किंवा कसे याबाबत कोठेही विवेचन करण्यात आलेले नाही. तथापि, जिल्हा परिषद, ठाणे यांनी आ.बी.पी.एस. मार्फत भरती प्रकियेची कार्यवाही केल्याचे नमूद करुन जिल्हा निवड समितीने आय.बी.पी.एस. मार्फत भरती प्रक्रिया राबविण्यास मान्यता दिली.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

ग्रामविकास विभागाचे अभिप्राय (वित्त-३) :- जिल्हा परिषदेने सेस मधून केलेल्या खर्चाबाबतच्या कार्यवाहीशी सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने रायगड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २८ ऑगस्ट, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी उप सचिव, ग्रामविकास विभाग यांनी समितीला जिल्हा परिषदेतील गट "क" व गट "ड" संवर्गाची रिक्त पदे भरण्यासाठी केलेल्या खर्चाबाबत विदित केले की, जिल्हा परिषदेने शासन निर्णय २००७ मधील तरतुदीनुसार परीक्षा व भरतीवरील खर्च त्यांच्या निधीतून केलेला आहे. विद्यार्थ्यांच्या जमा झालेल्या फी मधून खर्च केला आहे, अतिरिक्त खर्च शासन निर्णयानुसार कार्यवाही केली आहे. भरती प्रकिया ग्रामविकास विभागाकडे सेंट्रलाईज करणेबाबत शासन निर्णय निर्गमित केलेला आहे. राज्य स्तरावरून एकत्रित परीक्षा घेण्याची कार्यवाही सुरु आहे.

**अभिप्राय व शिफारशी**

सन २०१३-२०१४ या वर्षामध्ये रायगड जिल्हा परिषदेमधील गट "क" व गट "ड" संवर्गाची रिक्त पदे भरण्यासाठी केलेल्या खर्चाबाबत पुढील प्रमाणे लेखा आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. जिल्हा परिषदेतील गट "क" गट "ड" संवर्गाची रिक्त पदांची भरती प्रक्रिया आयबीपीएस या खाजगी संस्थेकडून पार पाडण्यासाठी रक्कम रुपये १३ लाख ९ हजार ५५५ एवढा खर्च झाला असल्याची खात्री होत नाही. यासंदर्भात समितीने जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली असता समितीच्या असे निदर्शनास आले की, जिल्हा परिषेदेतील गट "क" व गट"ड" संवर्गाची रिक्त पदे भरण्यासाठी केलेल्या खर्चाबाबतची रक्कम त्या त्या विभागाच्या खाते प्रमुखांच्या खात्यांवर जमा करण्यात आली असून या भरतीमध्ये १९ संस्थेमधील ९३ पदे आणि १० संस्थेमधील ११५ पदे भरण्यात आली आहेत. याकरिता काही खर्च तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिका-यांना प्राप्त अधिकारातून झाला होता व इतर खर्च सेस निधीतून करावा लागला, याकरिता जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेमध्ये मंजुरी नव्हती. परस्पर निधी खर्च करण्यात आला असून शासन स्तरावर सदर विषय पाठविण्यात आलेला नव्हता, त्यामुळे सदर भरती प्रक्रिया कोणामार्फत राबवावयाची याबाबत शासनाची मान्यता घेतलेली नाही व भरतीकरिता सेस फंडाचा निधी खर्च केलेला आहे. सबब, या प्रकरणी समिती तीव्र नाराजी व्यक्त करीत आहे.

**जिल्हा परिषदेमधील भरती प्रक्रिया चांगल्या प्रकारे झाली असली तरी ती नियमानुसार राबविणे आवश्यक होते. यासंदर्भात लेखा आक्षेपामध्ये त्रुटी आढळून आलेल्या आहेत. तत्कालीन जिल्हाधिका-यांनी संपूर्ण भरती प्रक्रिया विचारात घेऊन कार्यवाही करणे अपेक्षित होते. मुख्य कार्यकारी अधिका-यांनी परीक्षा फी म्हणून अनेक उमेदवारांकडून पैसे वसूल केले आहेत. असे असताना जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून देखील पैसे काढून आयबीपीएस या खाजगी कंपनीला जिल्हाधिका-यांनी त्यांच्या कक्षेत देखील शासनाची मान्यता न घेता भरती प्रकियेस मान्यता देणे ही बाब नियमानुकूल नाही. या प्रकरणी एकाच कामासाठी म्हणजे कर्मचा-यांची भरती प्रकिया राबविण्यासाठी जिल्हा परिषदेच्या सेस फंडातून तसेच परीक्षा फी म्हणून संबंधित उमेदवारांकडून सुध्दा पैसे वसूल करणे ही बाब शासनाची उघडउघड फसवणूक करणारी असल्याने प्रस्तुत प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात यावी व चौकशीनुसार संबंधितांची जबाबदारी निश्‍चित करण्यात यावी व त्यानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा अशी समिती शिफारस करीत आहे.**

प्रकरण दोन

## जिल्हा परिषद, रायगड
## पर्यावरण ग्रामसमृध्दी योजनेतील अनियमिततेबाबत

### परिच्छेद क्रमांक ३.३ (सन २०१३-२०१४)

जिल्हा परिषद, रायगड सन २०१३-२०१४ (परिच्छेद क्र.२) याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्रमांक व्हीपीएम/२०१२/प्र.क्र.२१७/पंरा-४, दिनांक ४ जुलै, २०१३ मधील अटी व शर्ती यांचे पालन करण्यात आलेले नाही.

(२) १५ पंचायत समित्यांना अनुदान प्राप्त झालेबाबत त्यांचेकडील नमुना क्रमांक ७ च्या पावत्या उपलब्ध झालेल्या नाहीत.

(३) शासन निर्णय दिनांक ११ ऑगस्ट, २०११ मधील अटी व शर्ती नुसार अनुदानाचे विनियोग, उपयोगिता प्रमाणपत्र नस्ती सोबत नसल्यामुळे खर्चित व अखर्चित रक्कम किती आहे, याची खात्री करता आली नाही.

(४) शासन निर्णय ग्रामविकास व जलसंधारण विभाग, दिनांक १८ ऑगस्ट, २०१० मध्ये नमूद केल्याप्रमाणे अनुदान कोणत्या बाबींबर खर्च केले आहे, याबाबत अभिलेख उपलब्ध केले नाहीत.

(५) अनुदान वितरीत केल्यानंतर २०% कामे व कार्यवाही केल्याबाबत अभिलेखे नस्तीसोबत ठेवली नाहीत.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितील जिल्हा परिषद, रायगड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) महाराष्ट्र शासनाचे ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे शासन निर्णय क्र. पर्यावरण ग्रामसमृध्दी योजनेसंदर्भात दिनांक १५ जुलै, २०१३ चे शासन निर्णयामध्ये देण्यात आलेल्या अटी व शर्तीचे पालन करणेत आले आहे. जिल्हा परिषदेमार्फत सन २०१३-१४ मध्ये गटांना रक्कम रुपये ४,२९,५२,०००/- पर्यावरण ग्राम समृध्दी योजनेचे अनुदान वित्तप्रेषणव्दारे संबधित ग्रामपंचायातींना पंचायत समिती मार्फत वर्ग करण्यात आले आहे. सन २०१३-१४ मध्ये रक्कम रुपये ४,२९,५२,०००/- एवढया रक्कमेची विनियोग उपयोगितापत्र महालेखापाल, महालेखापाल, मुंबई यांना पत्र क्र. राजिप साप्रशा/व्हीपी/योजना-१/२१२१/२०१४, दिनांक ६ सप्टेंबर, २०१४ अन्वये विनियोग उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर केले आहे.

(२) सन २०१३-१४ मधील अनुदान पर्यावरण ग्रामसमृध्दी योजनेचे असून सदरचा निधी पंचायत समिती मार्फत संबंधित ग्राम पंचायतींना वर्ग करण्यात आला आहे. त्यांच्या संबंधित ग्राम पंचायतीच्या नमुना नं.७ च्या पावत्या दप्तरी उपलब्ध आहेत.

(३) शासन निर्णय दिनांक ११ ऑगस्ट, २०११ मधील अटी व शर्ती नुसार अनुदान विनियोग उपयोगिता प्रमाणपत्र तालुकानिहाय उपलब्ध आहेत. तसेच सन २०१३-१४ मध्ये ४,२९,५२,०००/- रुपये एवढा निधी प्राप्त झाला असून अनुदान खर्च झाले असून अखर्चित अनुदान निरंक आहे.

(४) सदर खर्च हा संबंधित ग्राम पंचायातीने वृक्षलागवड, वृक्षसंवर्धन, गावातील सांडपाण्याचे व्यवस्थापन व जलनिस्सारण गटारे, रस्त्यावरील दिवाबत्ती, सौर पथदिवे, दहन-दफन भुमी बांधकामासाठी खर्च केलेला आहे.

(५) जिल्हा स्तरावरुन गठीत केलेल्या समितीमार्फत २०% कामांची तपासणी करुन त्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात आली आहे. त्या बाबतचे अभिलेख दप्तरी ठेवण्यात आले आहेत.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

रायगड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २३ ऑक्टोबर, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, आरटीजीएसने थेट पैसे ग्रामपंचायातीस का पाठविले नाहीत. उपयोगिता प्रमाणपत्र महालेखापाल, मुंबई यांच्याकडे विनाविलंब का पाठविले नाही, लेखापरीक्षावेळी नमुना क्रमांक ७ सादर न करण्याची कारणे काय आहेत, वृक्ष लागवड, वृक्ष संवर्धन, सांडपाणी व्यवस्थापन या प्रत्येक बाबीसाठी किती ग्रामपंचायतींची बाबवार निवड केली होती. समितीने तपासणी केलेले अभिलेख लेखापरीक्षणावेळी उपलब्ध नसल्याबाबतची कारणे काय, तपासाणीमध्ये कोणत्या त्रुटी आढळल्या तसेच पर्यावरण ग्रामसमृध्दीचे हे अनुदान कोणत्या कामासाठी खर्च करण्यात आले, ज्याचे उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले नव्हते.

यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला विदित केले की, लेखापरिक्षण झाले होते, त्यावेळी उपयोगिता प्रमाणपत्र दिले गेले नव्हते. पर्यावरण ग्रामसमृध्दी योजनेचे निकष होते त्यानुसार झाडे खरेदी केलेली होती, पथ दिवे लावले होते. यावर समितीने आक्षेप घेत विचारणा केली की, झाडे खरेदीची यु.सी. नाही. म्हणजे झाडे खरेदी झाली किंवा नाही यावर आक्षेप आहे. बिले सादर केली, त्यावेळी ग्रामसेवकांनी यु.सी दिली नसेल किंवा सरपंचाकडे मागणी केली असेल त्यांचा आक्षेप असेल, झाडे लावली नाहीत. यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला विदित केले की, उपयोगिता प्रमाणपत्र उपलब्ध आहे.

यावर समितीने विचारणा केली की, आर्थिक वर्ष पूर्ण झाल्यानंतर सहा महिन्यांनी लेखापरिक्षण झाले त्यावेळी लेखापरिक्षकांस उपयोगिता प्रमाणपत्र का उपलब्ध करुन दिले नाही. तसेच लेखापरीक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या काळात जे अधिकारी कार्यरत होते व जे आजही सेवेत आहेत त्यांना आजच्या बैठकीचे निमंत्रण देऊनही ते कारण न सांगता अनुपस्थित आहेत, याची माहिती समितीला द्यावी. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर माहिती सादर करण्याबाबत समितीला आश्वासीत केले असता समितीने विचारणा केली की, मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सर्व खाते प्रमुखांबरोबर बैठक झाली असेल, उप मुख्य कार्यकारी अधिका-यांनी उत्तर दिले पाहिजे होते. यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला पुढील प्रमाणे उत्तर दिले की, हा निधी ग्रामपंचायतींना वितरित केला होता. रुपये ४,२९,५२,०००/- एवढा निधी होता. त्यावेळी तत्कालिन उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) श्री.वाडेकर होते. यावर तत्कालिन उप मुख्य कार्यकारी यांनी विदित केले की, या ठिकाणी जी माहिती दिली आहे त्यानूसार उपयोगिता प्रमाणपत्र महालेखापालांना सादर केले आहे. मिळालेल्या उत्तराच्या अनुषंगाने समितीने विचारणा केली की, समितीच्या बैठकीच्या वेळी उपयोगिता प्रमाणपत्र सादर केले आहे. लेखापरिक्षण झाले. त्यावेळी सादर का केले नाही. शासन नियमाप्रमाणे अनुदान कोणत्या बाबींवर खर्च केले याचे अभिलेखे उपलब्ध केले नाहीत. सदर खर्च संबंधित ग्रामपंचायतींनी वृक्ष लागवड,वृक्ष संवर्धन, सांडपाणी व्यवस्थापन, गटारे, सौरदिवे, दिवाबत्ती यावर खर्च केला. ४.२९ कोटी रुपयांचे विवरण आहे का, समितीला दाखवू शकता? यावर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अनुदान कोणत्या बाबींवर खर्च केले यासंदर्भातील कागदपत्रे समितीला सादर केली.

तद्नंतर समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना पुढीलप्रमाणे निदेश दिले की, रुपये ४,२९,५२,०००/- या रक्कमेतून बरीच कामे केलेली आहेत. उपयोगिता प्रमाणपत्र दिले नाही, बिले तयार केलेली दाखविली नाही, लागवड केलेली झाडे कोणती आहेत ते दाखविले की नाही हा प्रश्न आहे. अनेक बाबतीत अनियमितता झाली आहे, या संदर्भात सखोल चौकशी करून समितीला अहवाल सादर करावा. यानुषंगाने विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागांकडून माहिती मागविली.**

पर्यावरण ग्रामसमृध्दी योजनेसाठी रुपये ४,२९,५२,०००/- या रकमेतून बहुतांश कामे केलेली असूनही उपयोगिता प्रमाणपत्र न देणे, तयार केलेली देयके न दाखविणे, लागवड केलेले वृक्ष दर्शविण्यात आले आहेत किंवा कसे याची माहिती नसणे इत्यादी अनियमितते प्रकरणी करण्यात आलेल्या चौकशीनूसार संबंधितांची जबाबदारी निश्चीत करुन केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस सादर करण्यात यावा.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

महाराष्ट्र शासनाचे ग्रामविकास व जलसंधारण विभागाचे शासन निर्णय, दिनांक १५ जुलै, २०१३ अन्वये पर्यावरण ग्रामसमृध्दी योजनेचे अनुदान जिल्हा परिषदेमार्फत सन २०१३-१४ मध्ये गटांना खालीलप्रमाणे रक्कम रूपये २,८४,५२,५८५/-, दिनांक ९ एप्रिल, २०१३, रक्कम रुपये ८६,००,०००/-, दिनांक २५ जानेवारी, २०१४, रक्कम रुपये ४५,००,०००/-, दिनांक २८ जानेवारी, २०१४, तसेच रक्कम रुपये १४,००,०००/- दिनांक २८ जानेवारी, २०१४ रोजी असे एकूण रक्कम रुपये ४,२९,५२,०००/- वित्त प्रेषणाद्वारे ग्रामपंचायतींना वाटप करणेसाठी गट विकास अधिकारी, पंचायत समिती यांना वर्ग करणेत आले आहे.

सन २०१३-१४ मध्ये प्राप्त झालेली रक्कम रुपये ४,२९,५२,०००/- एवढ्या रक्कमेचे विनियोग उपयोगिता प्रमाणपत्र महालेखापाल, मुंबई यांना दिनांक २० सप्टेंबर, २०१४ व शासनास दिनांक ६ सप्टेंबर, २०१४ रोजी सादर करण्यात आले आहेत. तसेच सदर रक्कमेचे अनुदान विनियोग उपयोगिता प्रमाणपत्र तालुकानिहाय प्राप्त झालेले आहेत. सदर तालुक्यांनी प्राप्त झालेले अनुदान खर्च केले आहेत व सदरची देयके ग्रामपंचायत स्तरावर खर्ची पडलेली आहेत. त्यामुळे अखर्चित अनुदान निरंक आहे.

सदरचा खर्च हा संबंधित ग्रामपंचायतीने वृक्ष लागवड व वृक्ष संवर्धन तसेच इतर बाबींसाठी खर्च केलेला असून सदर बाबींची तपासणी करीता त्यावेळी जिल्हास्तरावरुन गठीत केलेल्या कमिटीमार्फत २०% कामांची तपासणी करुन त्या अनुषंगाने कार्यवाही करणेत आली आहे, तसा अहवाल प्राप्त झाला आहे. जिल्ह्यातील सर्व गट विकास अधिकारी पंचायत समिती यांनी वरील योजनेच्या अटी व शर्तीनुसार खर्च केला असून सदर बाबत कोणतेही अनियमितता झालेली नाही.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :- जिल्हा परिषद, रायगड यांनी केलेल्या कार्यवाहीशी विभाग सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने रायगड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २८ ऑगस्ट, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीस उप सचिव, ग्रामविकास विभाग यांनी विदित केले की, ४ कोटी २९ लक्ष ५२ हजार रकमेचे उपयोगिता प्रमाणपत्र महालेखापाल कार्यालयास सादर केलेले आहे, कोणताही निधी अखर्चित नाही. समितीमार्फत २० टक्के कामाची तपासणी करुन अहवाल सादर झालेल आहेत. त्याप्रमाणे जिल्हा परिषदेने नियमानुसार कार्यवाही केलेली आहे. यामध्ये आता कोणत्याही त्रुटी नाहीत.

**अभिप्राय व शिफारशी**

सन २०१३-२०१४ या वर्षामध्ये जिल्हा परिषद, रायगड येथील पर्यावरण ग्रामसमृध्दी योजनेतील अनियिमिततेप्रकरणी पुढील प्रमाणे लेखा आक्षेप नोंदविण्यात आहे. पर्यावरण व ग्रामसमृध्दी योजनेबाबत दिनांक ४ जुलै, २०१३ रोजीच्या शासन निर्णयानुसार अटी व शर्तीचे पालन करण्यात आलेले नाही. १५ पंचायत समित्यांना अनुदान प्राप्त झालेबाबत नमुना क्रमांक ७ च्या पावत्या उपलब्ध झाल्या नाहीत. अनुदानाचे विनियोग, उपयोगिता प्रमाणपत्र नस्तीसोबत नसल्यामुळे खर्चित व अखर्चित रक्कम किती आहे याची खात्री करता आली नाही. कोणत्या बाबींवर अनुदान खर्च केले आहे याबाबत अभिलेख उपलब्ध केले नाहीत. अनुदान वितरीत केल्यानंतर २०% कामे व कार्यवाही केल्याबाबत अभिलेखे नस्तीसोबत ठेवले नाहीत.

उपरोक्त लेखा आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली असता समितीच्या निदर्शनास आले की, पर्यावरण ग्रामसमृध्दी योजनेचे अनुदान ज्या कामासाठी खर्च करण्यात आले त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र लेखा परिक्षणाच्यावेळी प्राप्त झाले नव्हते. आर्थिक वर्ष पूर्ण झाल्यानंतर सहा महिन्यांनी लेखापरिक्षण झाले असताना देखील उपयोगिता प्रमाणपत्र उपलब्ध करुन देण्यात आले नाही. याबाबत समिती सखेद आश्चर्य व्यक्त करीत आहे.

**वृक्ष लागवड, वृक्ष संवर्धन, सांडपाणी व्यवस्थापन, गटारे, सौरदिवे, दिवाबत्ती याकरिता रुपये ४ कोटी २९ लाख ५२ हजार एवढा खर्च झालेला आहे. यासंदर्भात उपयोगिता प्रमाणपत्र सादर करण्यात आल्याचे जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीमध्ये नमूद करण्यात आले असले तरी तालुकानिहाय खर्च करण्यात आलेल्या रक्कमेचे विवरण तसेच समितीमार्फत २० टक्के कामाची तपासणी करुन सादर झालेल्या अहवालाबाबतची माहिती आणि वृक्षारोपणसाठी ज्या रोपांची निवड करण्यात आली नाही त्याबाबतची सांख्यिकीय माहिती समितीच्या अवलोकनार्थ एक महिन्याच्या आत सादर करण्यात यावी अशी समिती शिफारस करीत आहे.**

प्रकरण तीन

## जिल्हा परिषद, रायगड

## प्राथमिक आरोग्य केंद्राच्या औषधी अनुदानात वाढ (ओ.टी.एस.पी)

### परिच्छेद क्रमांक ३.७३९ (सन २०१३-१४)

जिल्हा परिषद, रायगड सन २०१३-१४ (परिच्छेद क्र.३) सन २०१३-१४ मध्ये प्राथमिक आरोग्य केंद्राच्या औषधी अनुदानात वाढ याविषयी रुपये १४,००,०००/- खर्च केला आहे. याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) महाराष्ट्र शासन, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्रमांक जीपीआर १००९/२९७/प्र.क्र.६८, दिनांक २८ फेब्रुवारी, २००३ अन्वये औषधे खरेदी करताना जी.जी.एस./ओड्डी केंद्रीय राज कामगार विमा, बृन्हमुंबई मनपा यांचेकडील कमीत कमी दर असलेल्या संस्थेकडून खरेदी करणे आवश्यक असताना तसे केलेले नाही.

(२) तांत्रिक मान्यता दिनांक २६ सप्टेंबर, २०१३ रोजी असताना खरेदी वर्षाअखेरीस केलेली आहे.

(३) औषधाची मागणी नस्तीत उपलब्ध झाली नाही तसेच फक्त आदिवारी क्षेत्रात औषध वाटप केल्याचे दिसून आले नाही.

(४) Tab furungotidore १०० mg ही औषधे ८ आठवडे उशिराने खरेदी केली आहेत. त्यापोटी रक्कम रुपये ९,२९६/- दंडाची रक्कम वसूल केलेली नाही. चाचणी अहवाल प्राप्त न झाल्याने २०% रक्कम कपात करणे आवश्यक असताना तसे केलेले नाही.

(५) औषधाचा विनियोग अहवाल उपलब्ध केला नाही. व्हिटामीन सिरप ६ आठवडे उशिराने पुरवठा केल्याबाबत रक्कम रुपये ७९३३/- वसूल करणे आवश्यक आहे.

उपरोक्त आक्षेपासंदर्भत समितीला जिल्हा परिषद, रायगड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.

(१) सह संचालक, आरोग्य सेवा (खरेदी कक्ष), मुंबई यांच्याकडील तांत्रिक मान्यता दिनांक २६ सप्टेंबर, २०१३ च्या पत्रातील अटीनुसार DHS, BMC, DMER, ESIC, DGS & D यांचे उपलब्ध वैध दरकरारापैकी न्युनतम दर असणा-याकडून खरेदी करण्याबाबत सुचित केल्याप्रमाणे न्युनतम दरावर खरेदी करण्यात आलेली आहे.

(२) तांत्रिक मान्यता दिनांक २६ सप्टेंबर, २०१३ रोजी प्राप्त झाल्यानंतर आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता करुन दिनांक २३ डिसेंबर, २०१३ रोजी प्रशासकीय मान्यता देवून दिनांक २४ डिसेंबर, २०१३ रोजी M/s.HAL यांना पुरवठा आदेश देण्यात आलेले होते. सदर पुरवठादाराने औषध पुरवठा करणेस असमर्थता दाखविल्याने मंजूर दर करारानुसार अन्य पुरवठारास पुरवठा आदेश निर्गमित करुन खरेदी करण्यात आली आहे.

(३) सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात प्राथमिक आरोग्य केंद्राकडून आवश्यक असलेल्या औषधांची मागणी पत्रे घेण्यात आली असून आदिवासी क्षेत्रात औषध वाटप केलेली आहे. त्याची नोंद औषधवाटप साठा रजिस्टर पृष्ठ क्र. ४७ वर घेतलेली आहे.

(४) दंडाची रक्कम रुपये ९,२९६/- वसूल करुन दिनांक २० जुलै, २०१८ रोजी चलनाने भरणा केलेली आहे. तसेच चाचणी अहवाल उपलब्ध असल्याने २०% रक्कम कपात केलेली नाही.

(५) प्राथमिक आरोग्य केंद्रांकडून औषधाचा वापर झाल्याबाबतचे विनियोग अहवाल दप्तरी उपलब्ध आहे. तसेच दंडाची रक्कम रुपये ७,९३३/- वसूल करुन दिनांक २० जुलै, २०१८ रोजी चलनाने भरणा केलेली आहे.

### मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष

रायगड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २३ ऑक्टोबर, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, दर करारामध्ये नमूद असणारी औषधे सदर कंपनीकडून दर करारानुसारच खरेदी केली आहे की अन्य पुरवठादाराकडून दर करारातील किंमतीने खरेदी केली आहे, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, सदरची औषधे मंजूर दर करारानुसारच खरेदी केली आहेत. मेसर्स हॉल यांनी सदरची औषधे पुरविण्यास असमर्थता दर्शविल्यामुळे मंजूर दर करारानुसारच अन्य पुरवठादारास पुरवठा आदेश देऊन सदर औषधे खरेदी केली होती.

यावर समितीला मिळालेल्या उत्तराच्या अनुषंगाने समितीने आक्षेप घेत पुढील प्रमाणे विचारणा केली की, लेखा परीक्षणाच्या वेळी उपलब्ध कागदपत्रे सादर न करणे ही बाब महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ अनुसार दंडाच्या कार्यवाहीस पात्र होते काय,

यामध्ये अतिशय गंभीर आक्षेप असा आहे की, औषधाची मागणी नस्तीत उपलब्ध झाली नाही, तसेच फक्त आदिवासी क्षेत्रात औषध वाटप केल्याचे दिसून आले नाही. मुळात या ठिकाणी मागणी नसताना तेथे पुरवठा करण्यात आला आहे. त्यामुळे निधी अखर्चित राहण्याची कारणे अशा पध्दतीने दिसून येतात. म्हणजे मागणी नसताना पेमेंट काढण्यात आले आहे मग अशा प्रकरणांमध्ये शंका येणार आहे की नाही.

यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी नोंदणी पुस्तिकेमध्ये या औषधांचा वापर झाल्याची नोंद आहे असे समितीला उत्तर दिले असता समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांना विदित केले की, ज्यावेळी हे आक्षेप येतात त्यानंतर आल्याला दोन वेळा त्यांचे निराकरण करण्याची संधी दिली जाते आणि त्यानंतरही आपल्याकडून या आक्षेपांची पूर्तता होत नसेल तर ही बाब गंभीर आहे. आपल्याला कलम ७ अनुसार कोणती कार्यवाही केली जाते याची माहिती आहे काय, यावर मुख्य कार्यकाही अधिकारी यांनी विदित केले की, कलम ७ अन्वये दंडाच्या रकमेची तरतूद आहे व सदर दंडाची रक्कम २० हजार रुपये आहे.

यावर समितीने मुख्य कार्यकाही अधिकारी यांची दिलेल्या उत्तराच्या अनुषंगाने असमाधान व्यक्त करीत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी कलम ७ चे वाचन करावे आणि त्यानुसार संबंधितांकडून सदर दंडाची रक्कम वसूल करावी असे निदेश दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

प्राथमिक आरोग्य केंद्राच्या औषधांची खरेदी मंजुर दर करारानुसार केल्याबाबतची कागदपत्रे लेखा परिक्षणाच्या वेळी उपलब्ध करुन न दिल्याप्रकरणी सखोल चौकशी करुन महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार संबंधितांविरुध्द केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस सादर करण्यात यावा.

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

या प्रकरणी संबंधितावर जबाबदारी निश्चित करुन महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार रक्कम रुपये २५,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार मात्र) वसूल करुन शासन खाती भरणा केलेली आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**सार्वजनिक आरोग्य विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषद, रायगड यांनी केलेल्या कार्यवाहीशी विभाग सहमत आहे.

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषद, रायगड यांनी केलेल्या कार्यवाहीशी विभाग सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने रायगड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्दयांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २८ आगॅस्ट, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या औषधांची खरेदी मंजूर दर करारानुसार केल्याबाबतची कागदपत्रे लेखा परिक्षणाच्या वेळी उपलब्ध करुन न दिल्याप्रकरणी सखोल चौकशी करुन महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार संबंधितांविरुध्द केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीला सादर करण्याबाबत सुचविले होते. यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीस विदित केले की, जिल्हा नियोजन समिती जिल्हा परिषद स्तरावर औषध खरेदीचा हा विषय होता. रितसर चौकशी करुन त्यांना दोषी धरण्यात आले होते. यावर समितीने विचारणा केले की, कार्यालय प्रमुख जिल्हा आरोग्य अधिकारी यांना जबाबदार का धरले नाही. संबंधितांवर कोणते आरोप आहेत. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी विदित केले की, त्यावेळी तत्कालिन मुख्य कार्यकारी अधिका-यांकडून दोषनिश्चिती केली होती.

तद्नंतर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीस पुढील प्रमाणे विदित केले की, जिल्हा नियोजन समिती जिल्हा परिषद अंतर्गत ओटीएसपी खरेदी करण्यात आली होती. समितीने भेट दिली तेव्हा दोन मुद्दे उपस्थित झाले होते. खरेदी केलेल्या प्रक्रियेची कागदपत्रे समितीला दाखविली नव्हती. मात्र पुरवठा आदेश दिले होते. यावर समितीने विचारणा केले की, हे समितीचे मुद्दे नसून लेखापरिक्षकांनी घेतलेल्या आक्षेपाबाबत आहेत. वास्तविक तांत्रिक मंजूरी घेण्याची जबाबदारी खाते प्रमुखांची आहे. फार्मासिस्टवर २५ हजार रुपये दंड कसा आकारला आहे. यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी विदित केले की, पुरवठा उशीरा झाला होता, पुरवठादाराकडून ०.५ टक्के दराने वसुली केली पाहिजे अशी तरतूद आहे. यावर समितीने विचारणा केली की, ही वसुली करण्याची जबाबदारी कार्यालय प्रमुख जिल्हा आरोग्य अधिका-यांची आहे की केवळ फार्मासिस्टची आहे. वास्तविक कार्यालय प्रमुखांची जबाबदारी आहे. यावर प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांनी समितीस पुढीलप्रमाणे विदित केले की, ज्यांनी उशीरा पुरवठा केला त्यांच्याकडून वसूली झाली पाहिजे होती, संबंधितांकडून रकमेची वसुली करण्यात आलेली आहे. तसेच त्यांनी खरेदीसंबंधीचे कागदपत्रे दाखविले नव्हते. याबाबत जिल्हा परिषद स्तरावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी केली व त्यांना २५ हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला असून त्यांनी शासन खाती भरणा केला आहे.

यावर समितीने नाराजी व्यक्त करुन विचारणा केली की, उशीरा पुरवठा झाला म्हणून पुरवठाधारकाकडून वसुली केली. पुरवठा उशीरा केला तरी त्याचे देयक कसे झाले होते. पुरवठादाराचे देयक तेव्हाच का थांबवले नाही. त्यावर तेव्हाच दंड का लावला नाही. त्याचे देयक कसे मंजूर झाले. कागदपत्रे दाखविली नाहीत त्याच वेळी कार्यालय प्रमुखांनी फार्मासिस्टवर कारवाई का केली नाही. वारंवार समितीसमोर हाच विषय येतो, समिती सचिवांची साक्ष घेत आहे. कोणावरही कारवाईची शिफारस केली जाते हे योग्य नाही. वरिष्ठ अधिका-यांना सोडून दिले जाते व खालच्या कर्मचा-यांवर कारवाई केली जाते. वास्तविक कार्यालय प्रमुख जबाबदार असावे. किमान कार्यालय प्रमुखांना कारणे दाखवा नोटीस तरी दिली पाहिजे. तसेच देयक मंजूर केले, देयक दिले, लेखापरिक्षकांनी आक्षेप घेतला म्हणून त्यांच्याकडून वसुली करण्यात येत आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी तात्कालिन मुख्य कार्यकारी अधिका-यांनी हे करायला हवे होते असे समितीला विदित केले. यावर समितीने निदेश दिले की, पुन्हा असे व्हायला नको याकडे लक्ष द्यावे. सचिवांकडून राज्य स्तरावर एक कार्यनिती ठरली पाहिजे, याबाबत स्पष्ट मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या पाहिजेत की, कोणत्या अनियमिततेकरीता कोणत्या अधिकारी किंवा कर्मचा-यावर कारवाई करावी. सध्याही तशी तरतूद आहे परंतु त्याची अंमलबजावणी होत नाही याचे दुःख आहे. म्हणजे या बाबी वारंवार चर्चेला येणार नाहीत. आक्षेप तेव्हाच निकाली निघून कारवाई झाली पाहिजे.

**अभिप्राय व शिफारशी**

सन २०१३-२०१४ या वर्षी जिल्हा परिषद, रायगड अंतर्गत प्राथमिक आरोग्य केंद्राच्या औषधी अनुदानामध्ये वाढ करण्यात आली असून त्यावर १४,००,०००/- रुपये इतका निधी खर्च करण्यात आला असून दिनांक २८ फेब्रुवारी, २००३ रोजीच्या वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या शासन निर्णयानुसार औषधे खरेदी करताना जी.जी.एस./ओडङी केंद्रीय राज कामगार विमा, बृहन्मुंबई महानगर पालिका यांचेकडील कमीत कमी दर असलेल्या संस्थेकडून खरेदी करणे आवश्यक असताना त्यांचेकडून खरेदी करण्यात न आल्याचे, खरेदी वर्षा अखेरीस केल्याचे तसेच आदिवासी क्षेत्रात औषध वाटप करणे गरजेचे असूनही आदिवासी क्षेत्रात वाटप न केल्याचे लेखापरिक्षणादरम्यान आक्षेप नोंदविण्यात आले आहेत.

लेखापरिक्षणादरम्यान Tab furungotidore १०० mg हे औषध आठ आठवडे उशिराने खरेदी केल्यामुळे त्याकरीता रुपये ९,२९६/- इतकी दंडाची रक्कम वसुली न केल्याचे तसेच व्हिटामिन सिरप सहा आठवडे उशिराने पुरवठा केल्याने त्याकरीता दंड रुपये ७,९३३/- वसुल न केल्याचे आक्षेप नोंदविण्यात आले आहेत.

सदरहू आक्षेपाच्या अनुषंगाने जिल्हा परिषदेमार्फत उपलब्ध वैध दर करारापैकी न्युनतम दराने खरेदी करण्यासंदर्भात आरोग्य विभागाच्या दिनांक २६ सप्टेंबर, २०१३ रोजीच्या पत्रातील अटीनुसार न्युनतम दराने औषधे खरेदी केल्याचे, नमूद पुरवठादराने औषध पुरवठा करणेस असमर्थता दर्शविल्याने मंजूर दरकरारानुसार अन्य पुरवठादारास पुरवठा आदेश निर्गमित करुन औषधे खरेदी करण्यात आल्याचे तसेच आदिवासी क्षेत्रात औषधे वाटप केल्याचे समितीस अवगत करण्यात आले तसेच Tab furungotidore १०० mg हे औषध उशिराने खरेदी केल्यामुळे ९,२९६/- रुपये इतका दंड वसुल करण्यात आल्याचे व व्हिटामिन सिरप उशिराने पुरवठा केल्याने त्याकरीता दंड रुपये ७,९३३/- वसुल केल्याचे समितीच्या निदर्शनास आणले.

समितीसमोरील विभागीय सचिवांच्या साक्षीदरम्यान कागदपत्रे लेखापरिक्षणाच्या वेळी उपलब्ध न करुन दिल्याबाबत महाराष्ट्र स्थानिक निधी लेखा परिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार औषधी पुरवठा करणा-या औषध विक्रेत्याकडून २५,०००/- रुपये दंड वसुल करण्यात आल्याचे समितीच्या निदर्शनास आले. या अनुषंगाने समितीने याप्रकरणी कार्यालय प्रमुख म्हणून जिल्हा आरोग्य अधिकारी हे सुध्दा जबाबदार असून यासंदर्भात शासन स्तरावरुन योग्य अशी कार्यनिती निश्चित करणे गरजेचे असल्याचे तसेच याप्रकरणी कोणते अधिकार किंवा कर्मचारी कारवाईस पात्र असतील यासंदर्भात स्पष्ट मार्गदर्शक सूचना निर्गमित करणे गरजेचे असल्याचे समितीचे अभिप्राय आहेत.

**महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार लेखापरिक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करुन देणा-या अधिकारी व कर्मचा-यांकडून रुपये २५,०००/- इतका दंड वसुल करण्याची तरतुद आहे. असे असताना संबंधित अधिकारी व कर्मचारी लेखापरिक्षकास कागदपत्रे उपलब्ध करुन देत नसल्याचे समितीच्या वारंवार निदर्शनास आले आहे. ही अतिशय गंभीर बाब असल्याने अशा प्रकारची प्रकरणे पुन्हा उद्‌भवू नये तसेच संबंधितांवर नियमाचा वचक निर्माण व्हावा याकरीता सदरहू प्रकरणी कार्यालय प्रमुख म्हणून जिल्हा आरोग्य अधिकारी यांची सुध्दा जबाबदारी निश्चित करण्यात यावी, तसेच यासंदर्भातील कारवाई प्रकरणी अधिक स्पष्टता येण्याकरीता शासन स्तरावरुन कार्यनिती आखण्यात येवून नियमाच्या उल्लंघनाबाबत कारवाईस पात्र अधिकारी किंवा कर्मचारी इत्यादीबाबत स्पष्ट व कठोर मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात याव्यात. तसेच लेखा परिक्षकास कागदपत्रे उपलब्ध करुन न देणे याबाबत अनेक लेखा आक्षेप आहेत. नियमांचे स-हास उल्लंघन होत असल्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे. याबाबत जिल्हापरिषद स्तरावर अधिकारी/कर्मचा-यांची कार्यशाळा घेवून त्यांना उचित मार्गदर्शन करावे. अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण चार

## जिल्हा परिषद, रायगड
## वाहनाच्या लॉग बुकातील अनियमितता

### परिच्छेद क्रमांक ३.७४१ (सन २०१३-१४)

जिल्हा परिषद, रायगड सन २०१३-१४ (परिच्छेद क्रं.५) सन २०१३-१४ आरोग्य विभागाकडील लॉगबुकाची तपासणी केली असता खालील प्रमाणे अनियमितता आहेत.

(१) महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, शासन परिपत्रक क्रं.प्रवास/१००५/प्र.क्र.३३/सेवा-५, दिनांक ८ जुलै, २००५ अन्वये जिल्हयाबाहेर केलेल्या प्रवासात मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मंजूरी घेणे आवश्यक असताना तशी मंजूरी घेण्यात आलेली नाही.

(२) मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मंजूरी न घेतल्यामुळे वाहनांचा खाजगी वापर झाला असे समजून प्रती किलोमिटर ५/- प्रमाणे रुपये ९५,१७६/- वसूल करण्यात यावी.

(३) अर्धसमास पत्रान्वये वाहन क्रमांक ६ के ९८७३ व एमएच-१२-५१६६ चे लॉग बुक व हिस्ट्री शिट मागणी करुनही लेखापरिक्षणात उपलब्ध केले नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, रायगड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) जिल्हयाबाहेरील प्रवास हा संबंधित वरिष्ठ कार्यालयाचे निर्देशानुसार बैठका संदर्भात असल्याने सदर जिल्हयाबाहेरील केलेल्या प्रवासास मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मंजूरी घेतलेली आहे.

(२) मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मंजूरी घेण्यात आलेली आहे.

(३) वाहन क्रमांक MH-06-K-9873 व MH-12-5166 चे लॉगबुक व हिस्ट्रीशिट अद्ययावत असून लेखा परिक्षणासाठी उपलब्ध आहेत.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

रायगड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २३ ऑक्टोबर, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, वाहनांचे लॉग बुक व हिस्ट्रीशीट लेखापरीक्षणावेळी सादर न करणेबाबत संबंधितांवर प्रशासकीय व दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे काय, यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला विदित केले की, अशा प्रकारची कारवाई केलेली नाही. यावर समितीने विचारणा केली की, याचा अर्थ असा होतो की, ही सर्व खटपट प्रवास भत्ता मिळविण्यासाठीच केलेली आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला विदित केले की, सदर प्रकरणी कार्योत्तर मान्यता घेण्यात आलेली आहे.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, लेखापरिक्षणाच्यावेळी लॉग बुक व हिस्ट्रीशीट का सादर केले गेले नाही, तसेच सदर प्रकरणी कार्योत्तर मंजुरी घेतली आहे. परंतु मुळात प्रवासासाठी कार्योत्तर मंजूरी घेतली जाऊ शकत नाही. जर काही तात्काळ असेल तरच कार्योत्तर मंजूरी घेतली जाते व ती देखील शासन देवू शकते. यावर जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी पुढीलप्रमाणे खुलासा केला की, आरोग्य विभागातील अधिका-यांना मुंबई, पुणे, ठाणे या ठिकाणी बैठकीसाठी जावे लागते. तसेच व्हॅक्सिन आणण्यासाठी ठाणे येथे गाडी जात असते.

यावर जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी त्यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी यांची तोंडी मंजूरी घेतली होती का असा समितीने प्रश्न उपस्थित केला असता तोंडी मंजूरी घेण्यात आली होती असे जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी समितीस उत्तर दिले. यावर समितीने पुढीलप्रमाणे मत व्यक्त केले की, जर तोंडी मंजूरी घेतली असेल तर प्रवास झाल्यानंतर देखील सदर टिपणीवर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी स्वाक्षरी केली असती. यासाठी कार्योत्तर मंजूरी घेण्याची काय आवश्यकता आहे. सदर प्रकरणी आपण कोणत्याही प्रकारची मंजूरी घेतलेली नव्हती केवळ आक्षेप आल्यामुळे कार्योत्तर मंजूरी घेतल्याचे दाखविले जात आहे, असे समितीला वाटते. आपणास त्यावेळी वेळ मिळून देखील आपण कार्यवाही केली नाही. केवळ पंचायती राज समितीचा दौरा आहे म्हणून कार्यवाही केल्याचे दिसून येत आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस विदित केले की, दिनांक ३० मार्च, २०१६ रोजी सदर प्रकरणी मान्यता घेण्यात आलेली आहे.

यावर समितीने आक्षेप घेत विचारणा केली की, मुख्य कार्यकारी अधिकारी कार्योत्तर मंजुरी देवू शकतात का, कारण जर प्रवास झाला असेल व प्रवासासाठी त्यांची अगोदर तोंडी मान्यता घेतली असेल तर ते नंतर देखील स्वाक्षरी करु शकतत. रायगड जिल्हा परिषदेमध्ये अतिशय गंभीर प्रकरणे दिसून येत आहेत. सदर प्रकरणी त्याच वेळी तात्काळ कार्यवाही करण्याची आवश्यकता असूनही कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे याबाबत सखोल चौकशी करुन संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन या प्रकरणी मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७

नुसार २५ हजार रुपये दंड, सेवा पुस्तिकेत नोंद आणि एक वर्षाची वेतनवाढ रोखण्याबाबतची कार्यवाही करावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस सादर करावा. यावर सदर प्रकरणी कार्यवाही करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीस आश्वासित केले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

सन २०१३-१४ मध्ये जिल्हा परिषद, रायगड आरोग्य विभागाच्या वाहनाचे लॉगबुक मधील अनियमिततेप्रकरणी सखोल चौकशी करुन संबंधितांविरुध्द जबाबदारी निश्चित करुन याप्रकरणी महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस सादर करण्यात यावा

**उपरोक्त मुद्दयासंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

या प्रकरणी संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार रक्कम रुपये २५,०००/- (अक्षरी रुपये पंचवीस हजार मात्र) वसूल करुन शासन खाती भरणा केलेली आहे. तसेच दोन कर्मचा-यांपैकी एक कर्मचारी सेवानिवृत्त झाले आहेत. उर्वरित एका कर्मचा-यांपैकी वेतनवाढ रोखण्याची कारवाई करण्यात आली असून त्याची नोंद सेवा पुस्तकात घेण्यात आली आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय :** जिल्हा परिषद, रायगड यांनी केलेल्या कार्यवाहीशी विभाग सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने रायगड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २८ ऑगस्ट, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने विचारणा केली की, आरोग्य विभागाच्या वाहनाचे लॉगबुकमधील अनियमिततेप्रकरणी सखोल चौकशी करुन संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्याबाबतचा विषय आहे. यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, कलम ७ नुसार २५ हजार दंड त्यांनी भरला आहे. यातील एक कर्मचारी सेवानिवृत्त आहे. उर्वरित कार्यरत एका कर्मचा-याची एक वर्षाची वेतनवाढ रोखण्याची कारवाई करण्यात आली असून त्यांच्या सेवापुस्तिकेत नोंद घेण्यात आली आहे. याबाबत कार्यवाही झाली आहे.

**अभिप्राय व शिफारशी**

दिनांक ८ जुलै, २००९ रोजीच्या वित्त विभागाच्या शासन परिपत्रकानुसार जिल्ह्याबाहेर केलेल्या प्रवासाकरीता मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मंजूरी घेणे आवश्यक असताना नमूद प्रवासाकरीता मंजूरी न घेण्यात आल्याचे तसेच वाहनाची लॉग बुक व हिस्ट्रीशिट मागणी करुनही लेखापरिक्षणास उपलब्ध करून न दिल्याचे समितीच्या निर्दनास आले. त्या अनुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड यांनी सदरहू प्रकरणी कार्योत्तर मंजूरी घेतली असून प्रवासापूर्वी तोंडी मंजूरी घेतली असल्याचे समितीस अवगत केले असता समितीने हा सर्व खटाटोप नियमबाह्य रितीने प्रवास भत्ता लाटण्याकरीता केला असल्याचे तसेच केवळ आक्षेप आल्यामुळे कार्योत्तर मंजूरी दाखविण्यात आल्याचे नमूद करुन याप्रकरणी सखोल चौकशी करण्यात येऊन संबंधितांची जबाबदारी निश्चित करावी असे समितीने निर्देश दिले असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीच्या निर्देशानुसार कार्यवाही करण्याचे आश्वासित केले.

समितीसमोरील साक्षीदरम्यान विभागीय सचिवांनी लॉगबुकमधील अनियमिततेप्रकरणी महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ नुसार कारवाई करण्यात आली असून रुपये २५,०००/- एवढा दंड संबंधितांकडून वसुल करण्यात आल्याचे तसेच एक कर्मचारी सेवानिवृत्त असून उर्वरित एका कर्मचा-याची एका वर्षाची वेतनवाढ रांखण्याची कारवाई करण्यात आली असून त्यांच्या सेवापुस्तिकेत तशी नोंद घेण्यात आल्याचे समितीच्या निदर्शनास आणले.

**सदरहू प्रकरणी महाराष्ट्र स्थानिक निधी लेखापरिक्षा अधिनियम, १९३० च्या कलम ७ च्या उल्लंघनाबाबत कार्यवाही करण्यात आली असून या प्रकरणी नियमबाह्यरितीने प्रवास भत्ता लाटला गेल्याचे व केवळ आक्षेप आल्यामुळे कार्योत्तर मंजूरी दाखविण्यात आल्याचे समितीच्या प्रथमदर्शनी आल्याने या प्रकरणी सखोल चौकशी करण्याबाबत कार्यवाही व्हावी तसेच पैशाचा गैरव्यवहार निदर्शनास आल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती तीन महिन्यांच्या आत समितीस उपलब्ध करुन देण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण पाच

## जिल्हा परिषद, रायगड
## शालेय पोषण आहार योजनेपासून लाभार्थी वंचित ठेवणेबाबत

### १) परिच्छेद क्रमांक ४.१०२ (सन २०१३-१४)

पंचायत समिती, पेण जिल्हा रायगड सन २०१३-२०१४ नुसार लेखापरिक्षण वर्षात शालेय पोषण आहारापासून विद्यार्थी वंचित ठेवल्याने याबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) संचालनालय, प्राथमिक शिक्षण, पुणे यांचे परिपत्रक क्रमांक शा.पो.आ.२००५-०६/प्रा.शि.स.३०२/प्राथ.शिक्षण संचालनालय, दिनांक १ ऑगस्ट, २००५ अन्वये इयत्ता १ली ते ५ वी च्या वर्गातील एकूण २,९२५ लाभार्थ्यांना शालेय पोषण आहार देण्यात आलेला नाही. तसेच इयत्ता ६ ते ८ वी मधील एकूण ७३६७ विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार देण्यात आलेला नाही.

(२) जिल्हा परिषद शाळा, उर्णोली, जोहे व पाडले या शाळांमधील उपस्थित विद्यार्थ्यांना काही कालावधीत शालेय पोषण आहार दिलेला नाही.

(३) याबाबत सर्वोच्च न्यायालयाने दिनांक २८ नोव्हेंबर, २०११ रोजी त्यांचे आदेशानुसार शालेय पोषण आहार देण्याचे बंधनकारक असताना याबाबत पंचायत समिती पेण, तालुक्यात उचित कार्यवाही झालेली नाही.

(४) लेखापरिक्षण कालावधीत संचालक (प्राथमिक) क्रमांक शापोआ/सुधायो/प्रशिस/३०३/२०११-१२/७१७७०, दिनांक १ नोव्हेंबर, २०२१ अन्वये पुरवठादार मार्केटिंग फेडरेशन लिमिटेड, मुंबई यांचेकडून उपरोक्त प्रमाणे करारपत्रातील नमूद अटी व शर्तीनुसार धान्याची माल पुरवठ्याबाबत कार्यवाही झालेली नाही.

(५) दिनांक १ नोव्हेंबर, २०२१ च्या पुरवठा आदेशातील अट क्रमांक १२ मध्ये नमूद केले नुसार शालेय पोषण आहारासाठी आवश्यक मालाची मागणी पुरवठा याबाबत योग्य ते संनियंत्रण झालेले नाही.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, रायगड यांचेकडून खालील प्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) शालेय पोषण आहार योजनेअंतर्गत पेण गटात शालेय पोषण आहार योजनेच्या धान्य पुरवठा करणेबाबतचा ठेका महाराष्ट्र स्टेट को-ऑप, कन्झ्युमर फेडरेशन लि. मुंबई. यांना शासनाकडून देण्यात आला होता. विहित वेळेत मागणी उपलब्ध न झाल्यास शाळांमधील पोषण आहार बंद होण्याची शक्यता होती. मात्र प्रत्यक्ष शाळास्तरावर शाळा व्यवस्थापन समितीने स्थानिक स्तरावर लोकसहभागातून मध्यान्ह भोजनाचे वाटप केलेले आहे. सदर मध्यान्ह भोजन वाटप केल्याबाबतचा नोंदी स्वतंत्र नोंदवहित करण्यात आल्या आहेत. सदर नोंदी दप्तरी उपलब्ध आहेत.

(२) जिल्हा परिषद शाळा, पाडले या ठिकाणी सर्व विद्यार्थ्यांना प्रतिदिन शालेय पोषण आहाराचे वितरण करण्यात आले असून त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा खंड पडलेला नाही. तसेच रायगड जिल्हा परिषद शाळा उर्णोली, जोहे या शाळांमध्ये शासनाकडून पुरवठा झाला नसला तरी प्रत्यक्ष शाळा स्तरावर शाळा व्यवस्थापन समितीने स्थानिक स्तरावर लोकसहभागातून मध्यान्ह भोजनाचे वाटप केलेले आहे. सदर नोंद रजिस्टर दप्तरी उपलब्ध आहे.

(३) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत पेण गटात शालेय पोषण आहार योजनेचा धान्य पुरवठा करणेबाबतचा ठेका महाराष्ट्र स्टेट को-ऑप. कन्झ्युमर फेडरेशन लि.मुंबई यांना शासनाकडून देण्यात आला होता. विहित वेळेत मागणी उपलब्ध न झाल्यास शाळांमधील पोषण आहार बंद होण्याची शक्यता होती. मात्र प्रत्यक्ष शाळा स्तरावर शाळा व्यवस्थापन समितीने स्थानिक स्थरावर लोकसहभागातून मध्यान्ह भोजनाचे वाटप केलेले आहे. सदर मध्यान्ह भोजन वाटप केल्याबाबतच्या नोंदी स्वतंत्र नोंदवहीत करण्यात आल्या आहेत. सदर नोंदी दप्तरी उपलब्ध आहेत.

(४) प्राथमिक शिक्षण संचालनालय, पुणे यांचे पत्र क्रं. शापोआ/सुधायो/प्रशिस/३०२/२०११-१२/७१७७० दिनांक १ नोव्हेंबर, २०२१ मधील सुचना क्रं. ९ नुसार पुरवठादाराने विहित वेळेत पुरवठा करणेबाबत आपल्या स्तरावरुन सुचना देणेबाबत दिनांक ८ जानेवारी, २०१४ रोजीच्या पत्राने वरिष्ठ कार्यालयास कळविले होते. मात्र विहित वेळेत पुरवठा न झाल्याने करारनाम्यातील अटीनुसार पुरवठादाराच्या देयकांमध्ये इयत्ता १ ली ते ५वी साठी रुपये ९,१८९ व इयत्ता ६वी ते ८वी साठी रुपये ६,४२९ इतका दंड आकारण्यात येवून कार्यवाही करण्यात आली आहे.

(५) प्राथमिक शिक्षण संचालनालय, पुणे यांचे पत्र क्रं.शापोआ/सुधायो/प्रशिस/३०३/२०११-१२/७१७७० दिनांक १ नोव्हेंबर, २०११ मधील सुचना क्रं. ९ नुसार पुरवठदाराने विहित वेळेत पुरवठा करणेबाबत आपल्या स्तरावरुन सुचना देणेबाबत दिनांक ८ जानेवारी, २०१४ रोजीच्या पत्राने वरिष्ठ कार्यालयास कळविले होते. मात्र विहित वेळेत पुरवठा न झाल्याने करारनाम्यातील अटीनुसार पुरवठाराच्या देयकांमध्ये इयत्ता १ली ते ५वी साठी रुपये ९,१८९ व इयत्ता ६ वी ते ८ वी साठी रुपये ६,४२९ इतका दंड आकारण्यात येवून कार्यवाही करण्यात आली आहे.

**(२) परिच्छेद क्रमांक ४.१०५ (सन २०१३-१४)**

**शालेय पोषण आहार वाटपातील अनियमितताः-**

पंचायत समिती, महाड विभाग अंतर्गत शाळेसाठी पुरवठा करण्यात आलेल्या शालेय पोषण आहार योजनेबाबत खालीलप्रमाणे अभिप्राय आहे.

(१) महाराष्ट्र शासन निर्णय क्र.शापोआ/२००४/२४६/०४ दिनांक ३१ मे, २००५ चा मुद्दा क्रमांक ४ अन्वये सर्वोच्च न्यायालयाच्या सूचनेनुसार जिल्हा व तालुकास्तर समित्या गठीत करून योजनेवर नियंत्रण ठेवण्याचे आहे. तसे लेखे उपलब्ध झाले नाहीत.

(२) महाराष्ट्र शासन निर्णय क्र.शापोआ/२००८/१५५/०४ दिनांक ३ मार्च, २००५ व शा.पो.आ./२००४/२४६, दिनांक ३१ मे, २००५ अन्वये पुरक पदार्थ इंधन मंजूरी व्यतिरिक्त आठवड्यातून किमान एकदा केळी, अंडी, बिस्किटे त्याचप्रमाणे कॅल्शियम व आयर्नच्या गोळ्या देण्याचे निर्देश असतांना तसे लेखे उपलब्ध झाले नाहीत.

(३) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, परिपत्रक क्रमांक शालेय पोषण आहार २००६(७)/१०६ प्रशि- ४ दिनांक २९ जानेवारी, २००६ अन्वये दुपारचे अन्न शिजवतेवेळी व वाटप करतेवेळी किमान एका मातेची उपस्थिती आवश्यक आहे. तसे लेखे उपलब्ध झाले नाहीत.

(४) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम २५(२) व २९(४) व मुंबई वित्तिय नियम, १९५९ चे नियम ५८(३) नुसार रुपये ५००/- पेक्षा ज्यादा अदा करावयाच्या रक्कमा धनादेशाने अदा करावयाच्या असताना रोखीने नियमबाहयरित्या अदा केल्या आहेत.

(५) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम ७९ नुसार रक्कम अदा करण्यापूर्वी साहित्य चांगल्या स्थितीत मिळाल्याचे व त्यांच्या नोंदी साठा नोंदवहीत नोंदी घेतल्याची कार्यवाही केली नाही.

(६) सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांना योग्या प्रमाणात प्रथिने कॅल्शियम मिळतात याची पडताळणी करणारी योजना अस्तित्वात असल्याचे दिसून आले नाहीत. तसेच संस्थेमार्फत शिजविलेल्या अन्नाचा तपासणी अहवाल सार्वजनिक आरोग्य प्रयोगशाळा कोकण भवन, नवी मुंबई यांचेकडून घेण्यात आला नाही.

(७) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ वे नियम ९१ नुसार साठा नोंदवही नमुना क्रमांक ३३ मध्ये नोंदी घेवून वरिष्ठ अधिका-यांकडून शिल्लक साठा पडताळून प्रमाणित केलेबाबत नोंदी उपलब्ध झाल्या नाहीत.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, रायगड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) यापूर्वी तालुका स्तरावर समिती स्थापन करण्यात आलेली नव्हती. तथापि, शाळा स्तरावर ग्रामस्तर समितीमार्फत नियंत्रण ठेवण्यात येत होते. सध्या तालुका स्तरावर शालेय पोषण आहार योजनेवर नियंत्रण ठेवण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली आहे.

(२) महाराष्ट्र शासन निर्णय क्र.शा. पो.आ/२००८/१५५/०४, दिनांक ३ मार्च, २००५ व शा.पो.आ./२००४/२४६/, दिनांक ३१ मार्च, २००५ अन्वये पुरक पदार्थ इंधन मजूरी व्यतिरिक्त आठवडयातून किमान एकदा केळी, अंडी, बिस्कीटे त्याचप्रमाणे कॅल्शियम व आयर्नच्या गोळ्या वाटप केलेल्या आहेत तसे लेखे शाळास्तरावर ठेवण्यात आले आहेत.

(३) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, परिपत्रक क्रमांक शालेय पोषण आहार २००६(७)/१०६ प्रशि- ४ दिनांक २९ जानेवारी, २००६ अन्वये दुपारचे अन्न शिजवतेवेळी व वाटप करते वेळी किमान एका मातेची उपस्थिती असते तसे अभिलेख ठेवण्यात आले आहेत.

(४) सदर योजनेच्या स्वयंपाकी मदतनीस यांचे खाते उघडले नसल्याने त्यांना रोखीने मानधन अदा करणेत आले आहे. त्यानंतर अदा करावायाच्या रक्कमा संबंधितांना धनादंशाद्वारे किंवा ङक्क्र्‌ द्वारे वर्ग करणेची दक्षता घेतली आहे.

(५) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती लेखासंहिता, १९६८ चे नियम ७९ नुसार रक्कम अदा करण्यापूर्वी साठा सुस्थितीत प्राप्त झालेबाबत नोंदी शाळा स्तरावरील नोंदवहीत घेतलेल्या आहेत.

(६) महाड येथून कोकण भवन येथे शिजविलेल्या अन्नाचे नमुने प्रयोग शाळेत तपासणीसाठी पाठविणे आवश्यक आहे. परंतु प्रयोग शाळा व महाडमधील अंतर जास्त असल्यामुळे अन्नाचे नमुने तेथे जाईपर्यंत खराब होतात. त्यामुळे अन्नाचे नमुने तपासणीसाठी पाठविण्यात आले नाहीत.

(७) शालेय पोषण आहार योजनेंतर्गत प्राप्त धान्य व धान्यादी मालाच्या नोंदी शाळा स्तरावर साठा वही नमुना क्रमांक २३ मध्ये ठेवल्या आहेत. सदर नोंदी अद्ययावत ठेवलेल्या आहेत या बाबत नमुना ३३ मधील शिल्लक साठा नोंदी व प्रत्यक्ष तांदुळ/धान्यादी माल हे बरोबर आहे काय याची पर्यवेक्षकी यंत्रणेकडून वारंवार तपासणी करण्यात आली आहे.

**(३) परिच्छेद क्रमांक ४.१०६ (सन २०१३-१४)**

**शालेय पोषण आहार योजनेंतर्गत केलेल्या खर्चाबाबतः-**

पंचायत समिती, म्हसळा जिल्हा रायगड सन २०१३-२०१४ मधील शालेय पोषण आहार योजने अंतर्गत (Mis Data Entry Online) डाटा एँट्री ऑपरेटर मानधनासाठी रक्कम रुपये ३८,४०० खर्च करण्यात आले असून याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) विभागाने मागविलेल्या तीन दर पत्रकावर लेखाधिकारी, गट विकास अधिकारी यांचा स्वाक्षरी नसून दरपत्रके असलेल्या लिफाफ्यावर आवक क्रमांक नमूद नाही.

(२) प्राप्त दर पत्रकापैकी श्रेयस एन्टरप्रायजेस यांच्या दरपत्रकावर संबंधितांची स्वाक्षरी नाही.

(३) शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, रायगड पत्र क्र.जा.क्र.राजिप/शिक्षण/प्राथ/शापोआ/लेखा ०७/९५८/२०१४, दिनांक ५ फेब्रुवारी, २०१४ नुसार मानधनावरील प्राप्त अनुदानाचा खर्च नियमाबाह्यपणे दरपत्रके मागवून केलेल्या कामांसाठी करण्यात आला आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, रायगड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) विभागाने मागविलेल्या तीन दरपत्रकावर लेखीधिकारी, गट विकास अधिकारी यांची स्वाक्षरी आहे. तसेच लिफाफ्यावर व दरपत्रकावर स्वाक्षरी करुन किमान दरपत्रकाचा विचार करुन कार्यवाही केलेली आहे.

(२) श्रेयस एन्टरप्रायजेस यांच्या दरपत्रकावर संबंधितांची स्वाक्षरी आहे.

(३) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे-१ यांचे दिनांक २६ डिसेंबर, २०१३ चे पत्राचे अनुषंगाने ज्या तालुक्यातील डाटा एन्ट्री ऑपरेटरची पदे रिक्त आहेत तेथे शालेय पोषण आहार योजनेंतर्गत एम.आय.एस डाटा एन्ट्री बाबत स्थानिक स्तरावर रूपये ९६००/- प्रति माह प्रमाणे रक्कम खर्च करण्यास परवनगी देण्यात आलेली आहे. म्हसळा तालुक्यात शालेय पोषण योजनेंतर्गत डाटा एन्ट्री ऑपरेटरचे पद रिक्त असल्याने सदरचे काम कोटेशन पद्धत अवलंबून किमान दर पत्रकाचा विचार करून श्रेयस एन्टरप्रायजेस म्हसळा यांचेकडून पूर्ण करून घेण्यात आलेले आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

रायगड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकरी यांची दिनांक २३ ऑक्टोबर ,२०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचाारणा केली की, शालेय पोषण आहार योजनेपासून लाभार्थी वंचित ठेवणेबाबत या प्रकरणामध्ये शाळांमध्ये विद्यार्थ्यांना काही कालावधीमध्ये शालेय पोषण आहार दिलेला नाही. यासंदर्भात असा आक्षेप आलेला आहे की, इयत्ता ६ वी ८ वी मधील एकूण ७ हजार ३६७ विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार देण्यात आलेला नाही असा आक्षेप घेण्यात आलेला आहे. लेखा आक्षेप आल्यानंतर जिल्हा परिषदेला ३ वेळा संधी मिळाल्या होत्या. त्यानंतरही हे आक्षेप निकाली निघालेले नाहीत आणि त्यामुळे आता हा विषय पंचायती राज समिती समोर आलेला आहे याकरिता लागणा-या साहित्यांची खरेदी खुल्या बाजारपेठेमधून केली आणि व्यवस्था केली, असे दिसते. विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार मिळाला नाही, हा आक्षेप कसा आला. यावर सह संचालक, स्थानिक निधी लेखा यांनी खुलासा केला की, यासंदर्भात पुरवठा आदेश होता. परंतु तो जिल्हा परिषदेकडून लेखापरिणाच्या वेळी मिळालेला नाही.

यावर समितीने विचारणा केली की, पुरवठा केला नाही तर मुख्याध्यापकाने खुल्या बाजारपेठेमधून साहित्यांची खरेदी करावी असे उत्तरात दिलेले आहे. परंतु करारनाम्याप्रमाणे बाजारपेठेमधून खरेदी केली याबाबत खात्री केली आहे काय, ७ हजार ३६७ विद्यार्थ्यांना आहार पुरविण्यात आलेला नाही, असा आक्षेप घेण्यात आलेला आहे. विहीत मुदतीत पुरवठा केला नसेल तर शाळा व्यवस्थापन समितीने खुल्या बाजारपेठेमधून खरेदी कशी केली, परंतु यामध्ये असे दिलेले आहे की, पुरवठा झालेला नाही. तसेच हा पुरवठा लोकसहभागातून करण्यात आलेला आहे असे सांगितले आहे. यानंतर समितीने लोकसहभागातून साहित्याची खरेदी केलेली आहे असे करायला नको होते असे मत व्यक्त केले असता यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी विदित केले की, याबाबत शाळा व्यवस्थापन समितीने ठराव केला होता. त्यानुसार ही बाब केलेली आहे.

यावर समितीने मत व्यक्त केले की, शाळा व्यवस्थापन समितीनेच सांगायला पाहिजे होते की, लोकसहभागातून हे करायला नको. बाजारपेठेमधून खरेदी करायला पाहिजे होती. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना याबाबत सविस्तर माहिती नाही काय, यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी विदित केले की, याबाबत मला माहिती आहे. करारनाम्याच्या अटीप्रमाणे विहीत मुदतीत पुरवठा केला नाहीतर पोषण आहाराकरिता लागणा-या खर्चाच्या ५ पट दंड केला जातो.

यावर समितीने विचारणा केली की, आपण हा दंड वसूल केलेला आहे काय, यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी हा दंड वसूल केलेला आहे असे समितीस विदित केले. तद्नंतर समितीने पुढे विचारणा केली की, लोकसहभागातून साहित्यांची खरेदी केलेली असल्यामुळे लोकांची रक्कम परत केलेली आहे काय, यावर शिक्षणाधिकरी (प्राथमिक) यांनी विदित केले की, मुळात लोकसहभाग जास्त घेतलेला नव्हता. तसेच हा लोकसहभाग अन्नधान्याच्या स्वरूपात होता.

तद्नंतर समितीने विचारणा केली की, यासंदर्भातील दंडाची रक्कम रुपये ६४२९ वसूल केली आहे काय, यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी विदित केले की, सदर कालावधीत मालाचा पुरवठा झालेला नाही. म्हणून ती रक्कम पुरवठादारांना देय झालेली नाही. यावर समितीने विचारणा केली की, ७३६७ विद्यार्थ्यांना आहार पुरवठा केला नाही, त्याकरीता ६४२९ रुपये दंड आकारला आहे. प्रती विद्यार्थी ९० पैसे दंड केला का, तेवढे पैसे त्यांच्या बिलातून कपात करुन शाळेला का परत केले नाही, ज्या मुलांना पोषण आहार मिळाला नाही. ती मुले कीती दिवस आहारापासून वंचित होती, त्याचा खर्च किती होतो, तेवढी रक्कम दंड आकारणे आवश्यक होते. ६४२९ रुपये दंड पुरेसा नाही. याचे ठेकेदार कोण होते, यावर शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी विदित केले की, गुणानी फेडरेशन, मुंबई हे ठेकेदार होते.

तद्नंतर समितीने आक्षेप घेत निदेश दिले की, ठेकेदाराच्या बिलातून जेवढा खर्च आला तेवढी रक्कम वसूल करावयास पाहिजे होती. करारनाम्याप्रमाणे कंत्राटदाराने मालाचा पुरवठा केला नाही, शासनाने निधी दिलेला आहे. लोकांकडून धान्य गोळा केले आणि बिल सादर केले नाही. शालेय पोषण आहार योजनेच्या लाभापासून विद्यार्थ्यांना वंचित ठेवणे याबाबत समितीने चर्चा केलेली आहे. करारनाम्यातील अट क्रमांक २० प्रमाणे आहार पुरवठा करण्याबाबत शासनाने मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. राज्यात असे प्रकार मोठया प्रमाणात होतात, या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सखोल चौकशी करावी आणि पुरवठयादाराच्या संदर्भातील कारवाईचा अहवाल समितीला सादर करावा.

तद्नंतर समितीने परिच्छेद क्र. ४.१०५ शालेय पोषण आहार वाटपातील अनियमितता या विषयाच्या संदर्भात लेखापरीक्षणाच्या वेळेस लेखे सादर न करण्याची कारणे काय आहेत अशी विचारणा केली. तसेच अन्नाचे तपासणी अहवाल उपलब्ध झाले पाहिजेत. पुरवठा झालेला कच्चा आहार आहे, त्याचे नमुने लॅबमध्ये तपासणीसाठी पाठविले पाहिजेत असे मत व्यक्त करुन शालेय पोषण आहाराबाबतचे परिच्छेद क्रमांक ४.१०२, ४.१०५, व ४.१०६ या तीनही मुद्यांबाबत विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात येईल असे निदेश दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

(१) शालेय पोषण आहार योजनेपासून लाभार्थी वंचित ठेवणेबाबत :- शालेय पोषण आहार योजनेच्या करारनाम्यातील अट क्रमांक २० मध्ये आहारपुरवठा करणेबाबत शासनाने मार्गदर्शक तत्वे दिलेली असताना सन २०१४ मध्ये पंचायत समिती, पेण अंतर्गत एकूण ७३६७ विद्यार्थ्यांना पोषण आहार पुरवठा न केल्याप्रकरणी फक्त रुपये ६४२९ एवढा दंड आकारण्यात आला असणे, पोषण आहाराच्या खर्चाएवढा दंड न आकारणे, लोकसहभागातून पोषण आहार शिजवून दिला जाणे, करारनाम्यातील अटीप्रमाणे कंत्राटदाराने मालाचा पुरवठा न करणे, या प्रकरणी सखोल चौकशी करुन संबंधित अधिकारी/कर्मचारी व पुरवठादाराविरुध्द केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस सादर करण्यात यावा.

(२) शालेय पोषण आहार वाटपातील अनियमिततेबाबत :- पंचायत समिती, महाड व पंचायत समिती, म्हसळा अंतर्गत सन २०३-१४ मध्ये शालेय पोषण आहारासाठी पुरवठा करण्यात आलेल्या अन्नाचे तपासणी अहवाल उपलब्ध करुन देणे आवश्यक असणे, पोषण आहाराचे नमुने प्रयोगशाळेमध्ये तपासणीसाठी पाठविणे आवश्यक असणे, सदर शालेय पोषण आहाराच्या मुद्दयांच्या संदर्भात संबंधितांची जबाबदारी निश्चित करुन विभागाने केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस सादर करण्यात यावा.

**उपरोक्त मुद्दयांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

(१) सन २०१३-१४ मध्ये शालेय पोषण आहार योजनेंतर्गत पेण गटात शालेय पोषण आहार योजनेचा धान्य पुरवठा करणेबाबतचा ठेका महाराष्ट्र स्टेट को. ऑप. कन्झ्युमर फेडरेशन लि. मुंबई यांना शासनाकडून देण्यात आला होता. मात्र विहित वेळेत पुरवठादाराकडून पुरवठा न झाल्यामुळे करारनाम्यातील अट क्र. २० नुसार पुरवठादाराकडून इयत्ता १ ली ते ५ वी करिता रक्कम रुपये ९१८९ व इयत्ता ६ ते ८वी करीता रक्कम रुपये ६४२९ असा एकूण दंड रक्कम रुपये १५,६१८ एवढा दंड आकारुन वसूल करणेत आला आहे. तसेच, पुरवठादाराकडून धान्य व धान्यादी मालाचा पुरवठा विहित वेळेत न झाल्याने लाभार्थी योजनेपासून वंचित राहू नये याकरिता शाळा स्तरावर शाळा व्यवस्थापन समितीच्या मदतीने लोकसहभागातून पोषण आहार देणेत आला आहे.

तत्कालिन ठेकेदाराचा करार संपुष्टात आलेला असून त्यांच्यासोबत पुनश्चः करार करण्यात आलेला नाही. तसेच, याबाबत तत्कालिन गट शिक्षणाधिकारी व तत्कालिन अधीक्षक, शालेय पोषण आहार, पंचायत समिती यांच्यावर जबाबदारी होती. सबब त्यांचा खुलासा मागविणेत आलेला आहे.

(२) शालेय पोषण आहाराचे सन २०१३-१४ या वित्तीय वर्षामध्ये ५ नमुन्यांपैकी ३ नमुने तपासणीसाठी कनिष्ठ वैज्ञानिक अधिकारी, जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा, अहमदनगर यांचेकडे पाठवून त्याचा तपासणी अहवाल घेणेत आला होता.

तसेच, शालेय पोषण आहारासाठी पुरवठा करणेत आलेल्या अन्नाचे नमुने तपासणी करून घेणेची जबाबदारी तत्कालिन गट शिक्षणाधिकारी व तत्कालिन अधीक्षक, शालेय पोषण आहार, पंचायत समिती यांची होती. सबब परिच्छेद क्रमांक ४.१०५ व ४.१०६ बाबत संबंधिताचा खुलासा मागविणेत आलेला आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय**

**१) शालेय शिक्षण विभागाचे अभिप्राय :-** शालेय पोषण आहार योजनेंतर्गत ग्रामीण भागात धान्यादी मालाचा पुरवठा करणे व शहरी व ग्रामीण भागात तांदूळ वाहतूक करण्यासाठी ई-निविदा प्रक्रियेद्वारे जिल्हानिहाय पुरवठेदारांची नियुक्ती करण्यात येते. सदर पुरवठेदारासोबत प्राथमिक शिक्षण संचालनालयामार्फत करारनामा करण्यात येतो.

महाराष्ट्र स्टेट को-ऑप कन्झ्युमर फेडरेशन या संस्थेची रायगड जिल्ह्यात धान्यादी मालाचा पुरवठा करण्यासाठी सन २०१३-१४ मध्ये ई-निविदा प्रक्रियेद्वारे नियुक्ती करण्यात आली होती. सदर संस्थेबाबत केलेल्या करारनाम्यामधील अट क्र. २० मध्ये विहित कालावधीत पुरवठा न केलेल्या खंडीत पुरवठयापोटी खुल्या बाजारातून धान्यादी मालाची खरेदी करण्यात येईल व त्यासाठी येणारा अतिरिक्त खर्च पुरवठाादारांच्या देयकातून वसूल करण्यात येईल अशी तरतूद आहे. सन २०१३-१४ योजनेंतर्गत केंद्र शासनाने प्रति दिन प्रति लाभार्थी आहार खर्चाची मर्यादा प्राथमिक वर्गासाठी रूपये ३.२५ व उच्च प्राथमिक वर्गासाठी रूपये ४.८२ अशी निश्चित केली होती. त्यानुसार पुरवठेदाराच्या धान्यादी मालाचा पुरवठा अभावी शालेय पोषण आहार खंडीत झालेल्या दिवसाची वसूली प्रस्तुत दरानुसार पुरवठेदाराकडून होणे आवश्यक आहे.

केंद्र शासनाने दिनांक ३० ऑक्टोबर, २०१५ रोजी शालेय पोषण आहार नियमावली २०१५ अधिसूचित केली आहे. सदर नियमावली मध्ये विद्यार्थ्यांना शालेय दिवशी शालेय पोषण आहार न दिल्यास अन्न सुरक्षा भत्ता (Food Security Allowances) देण्याची तरतूद आहे तसेच कोणत्याही कारणास्तव सलग तीन दिवस अथवा महिन्यातून किमान पाच दिवस शालेय पोषण आहार बंद असल्यास याबाबतची चौकशी करून कारवाई करण्याची तरतूद नियमावली मध्ये आहे.

**१) शालेय शिक्षण विभागाचे अभिप्राय :-** संबंधित पुरवठेदारासोबत करण्यात आलेल्या करारनाम्यामध्ये पुरवठेदाराने धान्यादी मालाचा पुरवठा केल्यानंतर त्याची तालुका निहाय नमुने प्रथम शासकीय प्रयोगशाळेत पाठविण्यात येतील. प्रयोगशाळेकडून समाधानकारक अहवाल प्राप्त झाल्यानंतरच धान्यादी मालाची देयके अदा करण्यात येतील, असे नमुद करण्यात आले होते. त्यानुसार जिल्हा स्तरावरून कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने रायगड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २८ ऑगस्ट, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने शालेय पोषण आहार योजनेपासून लाभार्थी वंचित ठेवण्याबाबतच्या विषयासंदर्भात विचारणा केली असता उप सचिव, शालेय शिक्षण विभाग यांनी विदित केले की सन २०१३-१४ मध्ये पुरवठा झाला होता. त्याकरिता १४ दिवस उशीर झाला होता. सन २०११ मध्ये करारनामा केला होता. ठेकेदार महाराष्ट्र स्टेट कन्झ्युमर को ऑप फेडरेशन होते. करारनाम्यातील अटीनुसार दंडाची वसुली करण्यात आली आहे. पहिली ते पाचवीकरीता ९ हजार १८९ रूपये व सहावी, सातवीमध्ये उशीरा पुरवठा झाला त्याकरिता ६ हजार ४२९ रूपये असे एकूण १५ हजार ६१८ रूपये पुरवठादाराकडून वसूल करण्यात आले आहे. यावर समितीने संबंधित कालावधीत कंत्राटदाराचा करार संपलेला होता. यामुळे तो काय करणार आहे. जी काही कारवाई केली आहे तो समितीसमोर आहे. हे प्रकरण आता पूर्ण झालेले आहे. उक्त प्रकरणी वसुली झालेली आहे. शालेय पोषण आहार वाटपातील अनियमिततेबाबत हा विषय देखील सारखाच आहे. तो देखील सारखाच आहे. तो देखील पूर्ण झालेला आहे असे मत व्यक्त केले.

**अभिप्राय व शिफारशी**

सन २०१३-१४ या वर्षामध्ये घेण्यात आलेल्या लेखा आक्षेपानुसार पंचायत समिती, पेण (जि.रायगड) विभागांतर्गत शालेय पोषण आहारापासून इयत्ता १ ली ते ५ वी च्या वर्गातील एकूण २९१५ लाभार्थी विद्यार्थ्यांना तसेच इयत्ता ६ वी ते ८ वी मधील एकूण ७३६७ लाभार्थी विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार देण्यात आलेला नाही. तसेच पंचायत समिती, महाड विभागांतर्गत शाळेसाठी पुरवठा करण्यात आलेल्या शालेय पोषण आहार योजनेबाबतचे लेखे उपलब्ध झाले नाहीत. त्याचप्रमाणे पंचायत समिती, म्हसळा (जि. रायगड) विभागांतर्गत डाटा इन्ट्री ऑपरेटर मानधनासाठी खर्च करण्यात आलेले रूपये ३८,४०० रकमेबाबत विभागाने मागविलेल्या तीन दर पत्रकावर लेखाधिकारी, गटविकास अधिकारी यांची

स्वाक्षरी नसून दरपत्रके असलेल्या लिफाफ्यावर आवक क्रमांक नमूद नाही. प्राप्त दरपत्रकावर संबंधितांची स्वाक्षरी नाही. प्राप्त अनुदानाचा खर्च नियमबाह्यपणे दरपत्रके मागवून केलेल्या कामासाठी करण्यात आला आहे. इत्यादी लेखा आक्षेपासंदर्भात जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष घेतली असता समितीच्या निदर्शनास आले की, पंचायत समिती, पेण विभागांतर्गत शालेय पोषण आहारापासून इयत्ता १ ली ते ५ वी च्या वर्गातील तसेच इयत्ता ६ वी ते ८ वी मधील विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार पुरविण्यात आलेला नाही. सदर आक्षेप आल्यानंतर जिल्हा परिषदेला तीन वेळा संधी प्राप्त होऊन देखील आक्षेप निकाली निघालेला नसल्यामुळे पंचायती राज समितीसमोर विषय प्रस्तुत झालेला आहे. शालेय पोषण आहार योजनेचे साहित्य खुल्या बाजारातून खरेदी करून व्यवस्था करण्यात आल्याचे दिसून येते. पोषण आहार पुरवठा केला नसल्यामुळे मुख्याध्यापकांनी खुल्या बाजारातून साहित्यांची खरेदी करावी असे उत्तरामध्ये नमूद केलेल असले तरी करारनाम्याप्रमाणे बाजारपेठेमधून खरेदी केली आहे काय याबाबत खात्री केली असता समितीच्या निदर्शनास आले की, सदर पुरवठा लोकसहभागातून न करता खुल्या बाजारातून करणे आवश्यक होते. शाळा व्यवस्थापन समितीनेच ही बाब निदर्शनास आणून द्यावयास पाहिजे होती असे समितीचे स्पष्ट मत आहे.

**शालेय पोषण आहाराच्या करारनाम्याच्या अटीप्रमाणे विहीत मुदतीत पुरवठा न केल्यास पोषण आहाराकरीता लागणा-या खर्चाच्या ५ पट दंड आकारण्यात येतो. त्यानुसार दंड वसूल करण्यात आला आहे. पुरवठादाराकडून इयत्ता १ ली ते ५ वी करीता रक्कम रूपये ९१८९/- व इयत्ता ६ वी ते ८ वी च्या ७३६७ विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहार पुरवठा न केल्याप्रकरणी रूपये ६४२९/- एवढा दंड वसूल करण्यात आला आहे. तथापि, विद्यार्थ्यांच्या शालेय पोषण आहारासाठी आकारण्यात आलेला दंड पुरेसा नाही. कारण ठेकेदाराच्या देयकातून जेवढा खर्च आला तेवढी रक्कम वसूल करणे आवश्यक होते. करारनाम्याप्रमाणे कंत्राटदाराने मालाचा पुरवठा केला नाही. शासनाने निधी दिलेला असताना लोकांकडून धान्य गोळा केले आणि देयक सादर करण्यात आले नाही. त्यामुळे सदर योजनेच्या लाभापासून विद्यार्थ्यांना वंचित ठेवण्यात आल्याप्रकरणी समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. करारनाम्यातील अट क्रमांक २० प्रमाणे आहार पुरवठा करण्याबाबत शासनाने मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत. राज्यात असे प्रकार मोठया प्रमाणात होत असल्यामुळे ही बाब अत्यंत गंभीर आहे. याबाबत तत्कालिन गट शिक्षणाधिकारी व तत्कालिन अधीक्षक, शालेय पोषण आहार पंचायत समिती यांचेकडून मागविण्यात आलेल्या खुलाशावर संबंधितांची चौकशी करण्यात यावी व त्यानुसार संबंधित दोषींवर जबाबदारी निश्चित करून कडक स्वरूपाची कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

**पंचायत समिती, महाड विभागांतर्गत शालेय पोषण आहार वाटपातील अनियमितता या विषयाच्या संदर्भात लेखापरिक्षणाच्या वेळी कागदपत्रे/लेखे सादर करण्यात आले नाहीत. तसेच पंचायत समिती, म्हसळा अंतर्गत सन २०१३-२०१४ या वर्षामध्ये शालेय पोषण आहारासाठी पुरवठा करण्यात आलेल्या अन्नाचे तपासणी अहवाल उपलब्ध करून देणे आवश्यक होते व पोषण आहाराचे नमुने शासकीय प्रयोगशाळेमध्ये तपासणीसाठी पाठविणे आवश्यक होते. यासंबंधी कसूर केल्याप्रकरणी तत्कालिन गट शिक्षणाधिकारी व तत्कालिन अधीक्षक, शालेय पोषण आहार, पंचायत समिती संबंधितांकडून मागविण्यात आलेल्या खुलाशावर योग्य ती कार्यवाही करून त्यानुसार संबंधीत दोषींवर कारवाई करण्यात यावी, याबाबतचा केलेल्या कारवाईचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत पाठविण्यात यावा, अशी समिती शिफारस करीत आहे.**

प्रकरण सहा

## जिल्हा परिषद, रायगड घोडगांव, चिखलगांव अंगणवाडी बांधकाम करण्यातील अनियमितता

### परिच्छेद क्रमांक ४.६९७ (सन २०१३-१४)

पंचायत समिती, सुधागड पाली सन २०१३-१४ अंगणवाडी बांधकामावर रक्कम रूपये ४,४९,९९९/- केलेल्या खर्चाची नस्ती तपासली असता त्याबाबत खालील प्रमाणे अभिप्राय आहेत.

(१) दुस-या व अंतिम बिलासोबत जोडलेल्या कामाचे रंगीत छायाचित्र हे दिनांक २ जानेवारी, २०१३ या तारखेचे असून सदर छायाचित्रात काम पूर्ण झाल्याचे दिसून येते, कामाचे आदेश दिनांक १८ मार्च, २०१३ रोजी दिलेले असताना काम दिनांक २ जानेवारी, २०१३ रोजीच्या छायाचित्रात पूर्ण झाले कसे सदरचे काम दुस-या योजनेअंतर्गत राबविले आहे काय, याबाबत खात्री करता आलेली नाही.

(२) गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सुधागड पाली यांनी ग्रामपंचायत चिखलगाव यांना दिलेल्या सक्षमतेच्या दाखल्यावर पंचायतीचे सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाचे उत्पन्न नमूद कलेले नाही.

(३) मोजमाप पुस्तिकेत दुस-या व अंतिम बिलाच्या प्रमाणकाची मोजमापे कोणत्या दिवशी घेती याची दिनांक नमुद केलेला नाही. दिनांक नमूद न करता मोजमापे घेण्यात आली आहेत.

(४) करारनाम्यानुसार सदरचे काम दिनांक ३१ मार्च, २०१३ रोजी पुर्ण करणे आवश्यक असताना काम पुर्णत्वाच दाखल्यानुसार सदर काम दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ म्हणजेच ११ महिने उशिराने झालेले आहे. काम उशिराने झाल्याबद्दल दंडात्मक कार्यवाही केलेली नाही. दंडाची अट करारनामा किंवा कामाच आदेशामध्ये नमुद करणे आवश्यक असताना तशी कार्यवाही करणेत आलेली नाही. तरी दंडाची रक्कम वसुल करणे आवश्यक आहे.

(५) सिमेंट वापर प्रमाणपत्रानुसार पहिल्या देयकानुसार एकूण ९० बॅग सिमेंट वापरणे आवश्यक असताना देयकासोबत जोडलेल्या श्री.बल्लाळेश्वर बिल्डींग मटेरियल यांच्या पावतीनुसार एकूण १५० बॅग खरेदी करण्यात आलेल्या आहेत. म्हणजेच ६० बॅगची ज्यादा खरेदी केलेली आहे.

**उपरोक्त आक्षेपासंदर्भात समितीला जिल्हा परिषद, रायगड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी खुलासा कळविण्यात आला.**

(१) दुस-या व अंतिम बिलासोबत जोडलेले रंगीत छायाचित्र दिनांक २ जानेवारी, २०१३ रोजीचे दिसते. सदरची तारीख फोटो घेतलेल्या कॅमे-याची डिफॉल्ट सेटिंगची आहे. प्रत्यक्षात सदरचे काम दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ रोजीचे पुर्ण झालेले आहे. सदर कामाचे धावते देयत (प्रथम देयक) दिनांक १८ मे, २०१३ रोजी मोजमापे घेवून देण्यात आलेले आहे. प्रथम देयकाच्यो वेळेचे कामाचे छायाचित्र दप्तरी उपलब्ध आहे. म्हणजेच सदरचे काम कार्यादेश देण्याच्या अगोदर (दिनांक १८ मार्च, २०१३ पूर्वी) झालेले नाही. सदरचे काम अन्य योजनेतून प्रस्तावित अगर पूर्ण झालेले नाही. याबाबतचा उप अभियंता, रायगड जिल्हा परिषद, उप विभाग, पेण यांचा दाखला तसेच ग्रामपंचायत चिखलगांव यांचेकडीने दाखला दप्तरी उपलब्ध आहे.

(२) गट विकास अधिकारी, पंचायत समिती सुधागड पाली यांनी ग्रामपंचायत चिखलगाव यांना दिलेल्या सक्षम दाखल्यावर ग्रामपंचायतीचे सन २०१२-१३ या आर्थिक वर्षाचे उत्पन्न नमुद केलेला दाखला दप्तरी उपलब्ध आहे.

(३) मोजमाप पुस्तिकेत दुस-या व अंतिम बिलाच्या प्रमाणकाची अंतिम बिलाच्या प्रमाणकाची अंतिम मोजमापे दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ रोजी घेतली असून सदर नोंदीची मोजमाप पुस्तकात नोंद घेतली आहे.

(४) करारनाम्यानुसार सदरचे काम दिनांक ३१ मार्च, २०१३ रोजी पुर्ण करणे आवश्यक असताना काम पुर्णत्वाच्या दाखल्यानुसार सदर काम दिनांक २६ फेब्रुवारी, २०१४ म्हणजेच ११ महिने उशिराने झालेले आहे. सदरचे काम ११ महिने म्हणजेच ३३२ दिवस उशिराने पूर्ण झाले आहे. सदर कामास दररोज ५ रूपये दंड सक्षम प्राधिकारी यांच्या आदेशावरून आकारला असून ग्रामपंचायतकडून रक्कम रूपये १६६० मात्र वसुल करून शासन खाती जमा केले आहे.

(५) सिमेंट वापर प्रमाणपत्रानुसार पहिल्या देयकानुसार एकूण ९० सिमेंट बॅग वापरणे आवश्यक असताना देयक सादर केलेल्या श्री.बल्लाळेश्वर बिल्डींग मटेरिअल यांच्या पावतीनुसार एकूण १५० बॅग खरेदी करण्यात आलेल्या आहेत. सदर कामाच्या अंतिम देयकाच्या सिमेंट वापर

प्रमाणपत्रानुसार एकूण १५५ बॅग सिमेंट वापरल्याचे दिसून येते. त्यामध्ये पहिल्या देयकाच्या वेळी घेतलेले सिमेंट तेच काम पूर्ण करणेसाठी वापरण्यात आलेले आहे. उर्वरित पाच सिमेंट बॅगची पावती अंतिम देयकासोबत उपलब्ध आहे.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष**

रायगड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांची दिनांक २३ ऑक्टोबर, २०१८ रोजी साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी सतिमीने घोडगांव चिखलगांव अंगणवाडी बांधकाम करण्यातील अनियमिततेबाबत विचारणा केली असता यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, दाखला आहे व देयक झालेले आहे, काम सुस्थितीत आहे. यावर समितीने मत व्यक्त करुन निर्देश दिले की, कोणत्याही ग्रामपंचायातीला अग्रिम रक्कम दिली जात नाही. पहिले काम करावे लागते आणि नंतर रक्कम दिली जाते. कंत्राटदार आपले पैसे लावून काम करतो आणि ग्रामपंचायतीकडून पैसे घेतो. त्यामुळे दाखल्याची गरज काय, ग्रामपंचायतींची आर्थिक स्थिती सक्षम नसल्यामुळे मोठया प्रमाणात अनियमितता घडतात, कामे वेळेवर होत नाहीत. त्यामुळे या संदर्भात विभागीय सचिवांची साक्ष घेण्यात येईल.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

पंचायत समिती, सुधागड पाली अंतर्गत सन २०१३-२०१४ मध्ये घोडगांव, चिखलगांव अंगणवाडी बांधकामावर रुपये ४,४९,९९९ एवढी रक्कम खर्च करण्यात आली आहे. कोणत्याही ग्रामपंचायातीला अग्रिम रक्कम दिली जात नाही. कंत्राटदाराने काम पूर्ण केल्यानंतर रक्कम अदा करणे आवश्यक होते. सदर अनियमितते प्रकरणी सखोल चौकशी करुन संबंधितांची जबाबदारी निश्चित करुन केलेल्या कारवाईचा अहवाल समितीस सादर करण्यात यावा.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालीलप्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

पंचायत समिती, सुधागड पाली अंतर्गत सन २०१३-२०१४ मध्ये घोडगांव, चिखलगांव अंगणवाडी इमारत बांधकामास जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती, रायगड यांचेकडील पत्र जा. क्र/नियोजन/कार्या-२/आउयो/प्रमा-निविदा/२०१२/२०१२-२०१३ माहे डिसेंबर-२०१२ अन्वये प्रशासकीय मान्यता मिळाली असून या कार्यालयाकडील आदेश दिनांक १८ मार्च, २०१३ अन्वये ग्रामपंचायातीस कार्यारंभ आदेश देण्यात आले आहे. सदर प्रथम देयक कामाच्या मुल्यांकनानुसार दिनांक ३१ मे, २०१३ रोजी दिले असून दुसरे व अंतिम देयक काम पूर्ण झाल्यानंतर दिनांक १० मार्च, २०१४ रोजी दिलेले आहे.त्यामुळे सदर काम पूर्ण करण्यासाठी कंत्राटदारास कोणत्याही प्रकारचे अग्रिम देण्यात आलेले नाही. सदरचे काम दिनाक २७ फेब्रुवारी, २०१४ रोजी पूर्ण झाले असून अंतिम देयक दिनांक १० मार्च, २०१४ रोजी देण्यात आलेले आहे.

**मंत्रालयीन विभागाच्या अभिप्राय**

**महिला व बालविकास विभागाचे अभिप्राय:-** अंगणवाडी इमारत बांधकामाचे अग्रिम गट विकास अधिकारी यांचे मार्फत केले जाते. सदर बाब ग्रामविकास विभागाशी संबंधित असल्याने महिला व बाल विकास विभागाचा संबंध नाही.

**ग्राम विकास विभागाचे अभिप्राय :-** जिल्हा परिषद, रायगड यांचे अभिप्रायाशी विभाग सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने रायगड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यांवर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २८ ऑगस्ट, २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने घोडगांव, चिखलगांव अंगणवाडी बांधकाम करण्यातील अनियमिततेच्या प्रकरणासंदर्भातील अंतिम देयक देण्यात आलेले असल्यामुळे समाधान व्यक्त केले आहे.

**अभिप्राय व शिफारशी**

रायगड जिल्ह्यातील पंचायत समिती, सुधागड पाली अंतर्गत घोडगांव, चिखलगांव येथील अंगणवाडी बांधकामावर रुपये ४,४९,९९९ खर्च करण्यात आले सदरहू अंगणवाडीचे बांधकाम करणा-या कंत्राटदारास नियमबाह्य रितीने बांधकाम पूर्ण होण्याअगोदर रक्कम अदा केल्याबाबत आक्षेप नोंदविण्यात आले होते.

या आक्षेपाच्या अनुषंगाने जिल्हा परिषद, रायगड यांचेकडून खुलासा करण्यात आला असून जिल्हा परिषद कार्यालयाच्या दिनांक १८ मार्च, २०१३ रोजीच्या आदेशान्वये ग्रामपंचायतीस कार्यारंभ आदेश देण्यात आला असून प्रथम देयक कामाच्या मुल्यांकनानुसार दिनांक ३१ मे, २०१३ रोजी दिले. दुसरे व अंतिम देयक काम पूर्ण झाल्यानंतर दिनांक १० मार्च, २०१४ रोजी देण्यात आले. याअनुषगांने कंत्राटदारास कोणत्याही प्रकारचे अग्रीम

देण्यात आलेले नाही. तसेच काम पूर्ण करण्यास झालेल्या विलंबास दररोज ५ रुपये दंड प्रमाणे रुपये १६६०/- वसूल करण्यात आल्याबाबत समितीस अवगत करण्यात आले.

समितीसमोरील विभागीय सचिवांच्या साक्षीदरम्यान समितीने यासंदर्भात समाधान व्यक्त केले. सदरहू अंगणवाडीच्या बांधकामासंदर्भात लेखापरिक्षकांनी आक्षेप नोंदविल्यानंतर जिल्हापरिषदांमार्फत आक्षेपांचे परिमार्जन विहित वेळेत केले जात नसल्याने अनावश्यक परिच्छेद लेखापरिक्षण अहवालामध्ये अंतर्भूत करण्यात येतात व त्या परिच्छेदांवरील कार्यवाही व चर्चा याकरिता समितीचा बहुमुल्य वेळ व ऊर्जा अनावश्यकरित्या खर्ची पडते व त्यातून काहीही निष्पन्न होत नाही, असे समितीचे अभिप्राय आहे.

या **अनुषंगाने लेखापरिक्षकांनी आक्षेप नोंदविल्यानंतर त्या आक्षेपांचा खुलासा विहित कालावधीत संबंधितांनी करावा, जेणेकरुन अनावश्यक परिच्छेद लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवालामध्ये येणार नाहीत व समितीचा बहुमुल्य वेळ व ऊर्जा त्यावर खर्ची पडणार नाही, याकरिता आवश्यक ती उपाययोजना आखणे तसेच आक्षेपांचा विहित वेळेत खुलासा करण्याबाबत संबंधितांची जबाबदारी निश्चित करणे गरजेचे असून यासंदर्भात स्पष्ट मार्गदर्शक सूचना शासन स्तरावरुन निर्गमित करण्याबाबत कार्यवाही व्हावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यांच्या आत उपलब्ध करावी, अशी समितीची शिफारस आहे.**

प्रकरण सात

## जिल्हा परिषद, रायगड
## सर्वसाधारण शिफारशी

### १) गैरव्यवहार/अपहार/अखर्चित रकमा जमा करण्याबाबत :-

समितीने राज्यातील जिल्हा परिषदांना भेटी दिल्या असता विशेषतः रायगड जिल्हा परिषदेत गैरव्यवहार व अपहाराच्या मोठ मोठ्या रकमा वसुलीविना प्रलंबित आहेत. अशी अनेक प्रकरणे समितीसमोर तपासणीसाठी आली असता समितीने या प्रकरणात सदरच्या रकमा शासन खाती जमा करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निदेशित केले आहे. सदर गैरव्यवहाराची/अपहाराची अनेक प्रकरणे असून ती जुनी आहेत. जिल्हा परिषदांनी वेळीच कार्यवाही केली असती तर शासनाचे कोट्यावधी रुपयांचा निधी या प्रकरणांमध्ये अडकून पडला नसता व तो वेळीच वसूल झाला असता. जिल्हा परिषदांनी सदरच्या रकमा संबंधितांवर प्रशासकीय कारवाई करुन वसूल केल्या असत्या तर या रकमा केव्हाच शासन खाती जमा झाल्या असत्या. शासनाचा विविध योजनांवरील निधी हा गैरव्यवहाराने जेव्हा हडपला जातो तेव्हा त्या त्या योजना राबविताना त्यात निश्चितच मोठ्या प्रमाणावर अनियमितता होऊन योजनेच्या फलनिष्पत्तीवर त्याचा विपरीत परिणाम होतो असे समितीला आढळून आले आहे. जिल्हा परिषदांकडून त्यांच्या कर्मचा-यांवर कारवाई करण्यात विलंब होत असल्यामुळे जिल्हा परिषदा अशा कर्मचा-यांना पाठीशी घालत असून त्यांचेवरील संभाव्य कार्यवाहीस पुढे ढकलण्याचा प्रयत्न करताना दिसतात. त्याद्वारे एकप्रकारे शासनाचा निधी वेळीच वसूल होत नसल्यामुळे याबाबत मोठ्या प्रमाणात प्रशासकीय अनियमितता होत असल्याचे समितीला आढळून आले आहे. **याप्रकरणी समिती अशी शिफारस करीत आहे की, जिल्हा परिषदेची योजना राबविताना संबंधित योजनेत एखादा गैरव्यवहार अथवा अपहार उघडकीस आला असल्यास त्या गैरव्यवहारासंदर्भात कोणत्याही परिस्थितीत तीन महिन्यात दोषारोपपत्र दाखल करुन असे प्रकरण सहा महिन्यात निकाली काढण्यासंदर्भात शासनाने निश्चित अशी भूमिका घ्यावी त्याचप्रमाणे अशी कार्यवाही मुदतीत पूर्ण करण्याची जबाबदारी जिल्हा परिषदेच्या संबंधित विभाग प्रमुखांवर सोपविण्यात यावी व असे विभाग प्रमुख गैरव्यवहाराच्या अथवा अपहाराच्या रकमा सहा महिन्यात शासन खाती जमा करण्यात अयशस्वी झाल्यास त्यांचेविरुध्द जबाबदारी निश्चित करुन त्यांच्यावर त्या प्रकरणी शिस्तभंगाची कार्यवाही करण्याबाबत विभागाने ठोस भूमिका घ्यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

शासनाकडून एखादी योजना राबविताना कोट्यावधी रुपयांचा निधी तरतूदी करुन मिळविला जातो व असा निधी वेळेत खर्च केला जात नाही व तो शासन खाती जमादेखील केला जात नाही. त्यामुळे वित्तीय बाबीत मोठ्या प्रमाणावर अनियमितता होत असून संबंधित अधिका-यांकडून रकमा वेळीच खर्च करण्याबाबत कमालीचा हलगर्जीपणा करण्यात येतो. कोट्यावधी रुपये अखर्चित ठेवल्यामुळे शासनाला असा निधी आवश्यक असणा-या अत्यंत महत्वाच्या योजनांवर खर्च करता येत नाही. पर्यायाने विविध भौगोलिक भागातील निधी वाटपातील असंतोष वाढतो. खर्चाच्या बाबतीतील अनियमितता व योजना राबविण्याच्या कामातील अधिका-यांद्वारा होत असलेला हलगर्जीपणा हा प्रशासकीयदृष्ट्या अत्यंत गंभीर असून त्यामुळे अखर्चित निधी राहून तो दुस-या महत्वाच्या योजनांवर खर्च केला जात नाही. **म्हणून एखाद्या योजनेसाठी मागितलेला निधी त्या योजनेची उपयुक्तता तसेच जनसामान्यांच्या हिताचा विचार करुन राबविणे आवश्यक आहे. जनतेला देय असलेल्या सुविधा योजना राबवून वेळीच मिळत नसल्याने जनतेत नैराश्य व संतापाच्या भावना वाढीस लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता अखर्चित रकमांवर बंधन टाकण्यासंदर्भात शासनाने या संदर्भात कडक धोरण आखून त्याची अंमलबजावणी संदर्भात जिल्हा परिषदांना एका परिपत्रकाद्वारे कळविण्यात यावे अशीही समितीची शिफारस आहे.**

गैरव्यवहार/अपहार/अखर्चित रकमा जमा करण्यासंदर्भात समितीने उपरोक्तप्रमाणे केलेल्या शिफारशीनुसार यासंदर्भात शीघ्रतेने कार्यवाही करुन रायगड जिल्हा परिषदेमधील रक्कमा शासन खाती जमा करण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी व पंचायती राज समितीने तपासणी केलेल्या अहवालासंदर्भात एकूण किती रकमेची शासन खाती वसुली केली याबाबीची माहिती समितीला कळविण्यात यावी, अशीही समितीची शिफारस आहे.

### २) लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करुन न देणे :-

समितीने रायगड जिल्हा परिषदेला भेट दिली असता अनेक लेखा परिच्छेदांमध्ये लेखा परिक्षकांना संबंधित लेख्यांवरील कागदपत्रे उपलब्ध करुन दिली नसल्याने त्याबाबतचा अंतिम अभिप्राय लेखा परिक्षकांस व्यक्त करता आला नाही. याबाबत समितीने असे लेखे विचारात घेतले असता अनेक प्रकारात लेखा परीक्षणाच्या वेळी कागदपत्रे उपलब्ध नव्हती, आता उपलब्ध आहेत असे समितीला सांगण्यात आले. लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध नव्हती त्याची कारणे काय या शोधात समितीला अनेक गंभीर बाबी निदर्शनास आल्या. **मुळात कागदपत्रे उपलब्ध असतानाही ते लेखा परिक्षणास न दाखविणे ही गंभीर बाब आहे. तो सरळ शिस्तभंगाचा प्रकार आहे. लेखा परीक्षक सुरूवातीला कागदपत्रे उपलब्ध करुन देण्यासाठी चार महिन्यांचा वेळ देतात व त्यानंतर पुन्हा दोन महिन्यांचा कालावधी संबंधितांना दिला जातो. असे असून देखिल संबंधित अधिकारी लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध करून देत नाहीत. मुंबई स्थानिक निधी लेखा परीक्षा अधिनियम, १९३० च्या**

**कलम ७ मध्ये सन २०११ पूर्वी लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध न करून देणा-या अधिका-यास केवळ १०० रुपयांचा दंड आकारण्यात येत असे. कदाचित त्यामुळे लेखा परिक्षणास कागदपत्रे उपलब्ध होत नसतील अशी समितीने भावना व्यक्त केल्यानंतर शासनाने सन २०११ मध्ये उक्त नियमाच्या कलम ७ मध्ये सुमारे रुपये २५,०००/- (रुपये पंचवीस हजार) दंडाच्या रकमेची तरतूद केली आहे. समितीने या प्रकरणी जिल्हा परिषदांना ज्या कोणी लेखा परीक्षणाचे वेळी लेखा परिक्षकांस कागदपत्रे उपलब्ध करुन दिली नाहीत अशा जबाबदार असणा-या सर्व संबंधितांना अधिनियमातील तरतूदीनुसार रुपये २५,०००/- इतका दंड आकारण्याची शास्ती करण्याचा निर्णय घेतला. त्यानूसार रायगड जिल्हा परिषदेमध्ये अशा किती व्यक्तींना प्रत्येक प्रकरणी दंड करण्यात आला व एकूण किती रक्कम शासन खाती जमा करण्यात आली याची संपूर्ण माहिती प्रकरणनिहाय समितीला तीन महिन्यात पाठविण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

### ३) नियमानुसार व नैसर्गिक न्याय तत्त्वाला अनुसरुन दोषीतांवर कारवाई करण्याबाबत :-

संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीततेसाठी शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, प्रभावी व अर्थपूर्ण असे नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे म्हणून कार्यकारी प्रशासन राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी, त्यातील त्रुटी शोधून काढून योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी पंचायती राज समितीची रचना करण्यात आली. समितीला अधिकार मिळाल्यावरुन समितीने अनेक प्रकरणात दोषीतांवर कार्यवाही करण्याबाबत शासनाला निर्देश दिले आहेत. असे निर्देश देत असताना समितीने एखाद्या अधिकारी/कर्मचा-याची प्रथमदर्शनी चूक आढळून देखील संबंधित दोषींविरुध्द जाणीवपूर्वक निलंबनाची कारवाई प्रस्तावित केली जात नाही. भारतीय संविधानाने प्रत्येकाला समान संधी देण्याचे धोरण अंगिकारल्याने कारवाई करताना देखील दोषीताने तो निर्दोष असल्याचे अभिकथन करणे आवश्यक आहे असे समितीला प्रकर्षाने वाटते. कोणत्याही निर्दोष व्यक्तीवर दोष लादले जाणे हे नैसर्गिक न्याय तत्त्वाला अनुसरुन नाही असे समितीला वाटते. म्हणून प्रशासनाने कार्यवाही करताना कोणत्याही निर्दोष व्यक्तीला शास्ती करु नये आणि दोषी व्यक्तीला कोणत्याही परिस्थितीत शास्तीविना सोडू नये असे समितीला वाटते. भेटीच्या वेळी संबंधित प्रकरणाची निष्पक्षपणे चौकशी करुन चौकशी अहवालामध्ये दोषीविरुध्द कार्यवाही करून त्यास शिक्षा करणे योग्य आहे. **तथापि, एखाद्या निर्दोष व्यक्तीवर कार्यवाही केल्यास ती समितीच्या सूचनेनूसार कार्यवाही केली असे म्हणणे ही बाब समाजाची लोकशाही व्यवस्थेवरील विश्वास उडवणारी आहे. जनमानसात समितीची भूमिका ही प्रशासनाने केलेल्या चांगल्या व वाईट बाबींना शोधून काढून त्यातून जनतेप्रती महत्त्वाची कामे कशी केली जातील याबाबतची प्रतिमा उभी करणे हे संसदीय लोकशाहीने दिलेले एक कर्तव्य आहे. समितीची नाहक बदनामी काही कर्तव्यपारायणवत व सचोटी नसलेले अधिकारी निर्माण करतात आणि जाणीवपूर्वक वैयक्तीक द्वेषापोटी, हेवेदाव्यापोटी निर्दोष व्यक्तींवर कार्यवाही करून समितीची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करतात. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सतर्क राहणे आवश्यक असून एखादा गुन्हेगार सुटत असताना त्यास नैसर्गिक न्याय मिळेल परंतु एखाद्या निर्दोष व्यक्तीला शिक्षा होता कामा नये ही समितीची भूमिका असल्यामुळे समितीने ज्या ज्या प्रकरणांमध्ये चौकशी करण्याचे निर्देश दिलेले आहेत. अशा सर्व प्रकरणांमध्ये दोषारोपांची चौकशी करताना सर्व संबंधीत व्यक्तींना नैसगिक न्याय तत्त्वानूसार तसेच शासनाने वेळोवळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयानूसार संपूर्ण वस्तुस्थिती विचारात घेतल्यानंतरच निःपक्षपातीपणे कार्यवाही करुन दोषींना शास्ती तर निर्दोषींना मुक्ती या तत्त्वानुसार कारवाई करण्यात यावी, अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

# रायगड जिल्हा परिषदेच्या

# सन २०१४-२०१५ च्या

# वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात

प्रकरण एक

## जिल्हा परिषद, रायगड (प्रशासन)

### समितीने रायगड जिल्हा परिषदेला भेट दिली असता रायगड जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी व जिल्हा परिषदेच्या पदाधिका-यांसोबत केलेल्या अनौपचारिक चर्चेच्या वेळी समितीच्या निदर्शनास आलेल्या बाबीसंदर्भात

पंचायती राज समितीने दिनांक २३ ते २५ ऑक्टोबर, २०१८ या कालावधीत रायगड जिल्हा परिषदेस भेट दिली असता सन २०१३-१४ या वर्षाच्या प्रशासन अहवालावरील चर्चेदरम्यान रायगड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे व अनौपचारिक चर्चेदरम्यान समितीच्या निदर्शनास आलेल्या बाबींसंदर्भात समितीने संबंधितांना सुचित केले की, रायगड जिल्हा परिषदेच्या काही समस्या असतील तर त्या माननीय जिल्हा परिषद अध्यक्ष व इतर पदाधिकारी समितीसमोर मांडू शकतात. यावर सभापती, कृषी व पशुसंवर्धन समिती यांनी समितीस विदित केले की, रायगड जिल्ह्यामध्ये दुष्काळ पडतो. मात्र तो कायम ओला दुष्काळ असतो. सुका दुष्काळ कोकणामध्ये कधीही पडत नाही. कोकणात पाऊस भरपूर पडतो आणि त्यामुळे येथील शेतीचे नुकसान होते.

तद्नंतर उपाध्यक्ष जिल्हा परिषद, यांनी समितीस विदित केले की, जिल्ह्यामध्ये खार जमिनीचा मोठा प्रश्न असून तो डी.पी.सी.मध्ये मांडला होता. सन १९७९ मध्ये अहमदनगर येथील विद्यापीठाची टीम सर्व्हे करण्यासाठी येऊन गेली होती. त्यावेळी सर्व बांध वाहून गेले होते. त्यानंतर सन १९९० मध्ये पुन्हा तीच स्थिती निर्माण होऊन सर्व बांध वाहून गेले. पूर्वी बांधबंदिस्तीमुळे खार जमिनीचे नुकसान होत नव्हते. मात्र हे बांध वाहून गेल्यामुळे त्या ठिकाणी खारफुटी (मॅन्ग्रोज) निर्माण झाले आहेत व आमच्या जिल्ह्यातील शेतक-यांची हजारो एकर शेती नष्ट झाली आहे. आता ते खारफुटी (मॅन्ग्रोज) काढता सुद्धा येत नाहीत. कारण सन २००० मध्ये एक पर्यावरणवादी एन.जी.ओ. संस्था मुंबई उच्च न्यायालयामध्ये गेलेली असल्यामुळे त्याबाबतचे प्रकरण अद्याप तेथे प्रलंबित आहे. हा प्रश्न सुटत नसल्यामुळे हजारो शेतकरी उद्ध्वस्त होणार आहेत. शासनाच्या वतीने त्या एन.जी.ओंच्या विरोधात कोणतेही अपिल किंवा बाजू मांडली गेलेली नाही. यावर समितीने विचारणा केली की, ओला दुष्काळ किंवा खाडीलगतच्या शेतीमध्ये खारफुटी (मॅन्ग्रोज) तयार होऊन शेतीचे झालेले नुकसान, पूर्वी त्याच जागेवर शेती होणे, मात्र बंधारे फुटल्यामुळे शेतीचे नुकसान होणे या कारणास्तव जर पीक (फसल) विमा योजनेमध्ये अशा शेतीचा समावेश केला तर शेतक-यांना विमा रक्कम मिळू शकते.

तद्नंतर उपाध्यक्ष जिल्हा परिषद यांनी समितीस विशद केले की, समुद्राचे खारे पाणी शेतजमिनीमध्ये घुसल्यामुळे त्या ठिकाणी खारफुटी (मॅन्ग्रोज) वाढले आणि पर्यावरण विभागाच्या अडचणीमुळे आता ते काढता येत नाहीत. पर्यावरणाच्या या समस्येमध्ये शेतक-यांची सुमारे ३० ते ३५ हजार एकर जमीन अडकली आहे.

तद्नंतर उपाध्यक्ष जिल्हा परिषद यांनी समितीस विशद केले की, लेखाशीर्ष २५१५ अंतर्गत प्राप्त होणारा निधी खर्च करण्याची बाब जिल्हा परिषदेच्या अखत्यारित आहे. मात्र तो निधी सुद्धा कमी प्राप्त होतो. यावर समितीने निदेश दिले की, रायगड जिल्ह्यातील खार जमिनीचा हा महत्त्वाचा विषय आहे. मदत व पुनर्वसन विभागाच्या सचिवांची साक्ष आयोजित करण्यात येईल असे समितीने आश्वासन दिले.

**उपरोक्त माहितीच्या संदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने खालील मुद्यांबाबत विभागाकडून माहिती मागविली.**

रायगड जिल्ह्यातील शेतक-यांच्या खार जमिनीवर खारफुटीची वने (मॅग्रोव्ह ट्री ) पर्यावरण विभागाच्या जाचक अटीमुळे काढून टाकणे शक्य नसल्यामुळे तेथील शेतक-यांना सातत्याने ओल्या दुष्काळाला सामोरे जावे लागत असून शेतीचे फार मोठ्या प्रमाणात नुकसान होत आहे, याकरिता मदत व पुनर्वसन विभागाने उपरोक्त शेतक-यांसाठी कोणती कायमस्वरूपी उपाययोजना केली वा करण्यात येत आहे.

**उपरोक्त मुद्यांसंदर्भात जिल्हा परिषदेकडून समितीस खालील प्रमाणे लेखी माहिती प्राप्त झाली.**

सदर बाबत शासन स्तरावरून मार्गदर्शन अपेक्षित आहे.

**मंत्रालयीन विभागाचा अभिप्राय.**

**पर्यावरण विभागाचे अभिप्राय-**

**मदत व पुनर्वसन विभागाचे अभिप्राय-** समुद्राचे उधाण या स्थानिक नैसर्गिक आपत्तीप्रकरणी शासन निर्णय दिनांक ३० जानेवारी २०१४ अन्वये केवळ जिवितहानी करिता मदत अनुज्ञेय करण्यात आली आहे. समुद्राचे उधाण या स्थानिक आपत्तीमुळे शेतीपिकांचे नुकसान झाल्यास किंवा शेत कायमस्वरूपी नापीक झाल्यास मदत अनुज्ञेय नाही. ही बाब विचारात घेवून समुद्राच्या उधाणामुळे किनारपट्टी भागातील शेतपिकांच्या व शेतजमिनीच्या नुकसानीसाठी राज्य शासनामार्फत मदत देण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी या विभागामार्फत दिनांक ०५ मार्च २०१९ रोजी मंत्रिमंडळास प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

या प्रस्तावावर मंत्रिमंडळाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे. “खारभूमी विकास योजनेतंर्गत खारभूमी बंधारे पूर्ण झाले तर समुद्राच्या उधाणामुळे शेती पिकांचे नुकसान होणार नाही व वारंवार नुकसान भरपाई देण्याची गरज भासणार नाही. शिवाय शेतीसाठी पुनःप्रापित क्षेत्रदेखील वाढेल. त्यामुळे खारभूमी बंधारे कार्यक्रमासाठी सन २०१९-२० या आर्थिक वर्षी मंजूर असलेल्या अर्थसंकल्पीय तरतूदीमध्ये रू. १०० कोटी इतक्या रक्कमेची वाढ माहे जून, २०१९ मध्ये विभागास पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध करून देण्यात यावी. जलसंपदा (खारभूमी) विभागाने या उपलब्ध होणा-या वाढीव तरतुदीच्या अनुषंगाने घ्यावयाच्या कामाचे नियोजन करावे व अंमलबजावणी करावी.”

मंत्रिमंडळाच्या निर्णयानुसार पुढील आवश्यक कार्यवाही करण्याबाबत जलसंपदा (खारभूमी ) विभागास या विभागाच्या दिनांक १८.०३.२०१९ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. या संदर्भातील पुढील कार्यवाही जलसंपदा (खारभूमी) विभागाकडून करण्यात येत आहे.

**ग्रामविकास विभागाचे अभिप्राय-** जिल्हा परिषद रायगड यांच्या अभिप्रायाशी विभाग सहमत आहे.

**विभागीय सचिवांची साक्ष**

पंचायती राज समितीने रायगड जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे उपरोक्त मुद्यावर अधिक माहिती घेण्यासाठी दिनांक २८ ऑगस्ट २०१९ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. समितीने रायगड जिल्हा परिषदेला भेट दिली असता रायगड जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी व जिल्हा परिषदेच्या पदाधिका-यांसोबत केलेल्या अनौपचारीक चर्चेच्या वेळी समितीच्या निदर्शनास पुढील बाब आली आहे. रायगड जिल्ह्यातील शेतक-यांच्या खार जमिनीवर खारफुटीची वने म्हणजे मॅग्रोव्हज ट्री पर्यावरण विभागाच्या जाचक अटीमुळे काढून टाकणे शक्य नसल्यामुळे तेथील शेतक-यांना सातत्याने ओल्या दुष्काळाला सामोरे जावे लागत असून शेतीचे फार मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे, याकरीता मदत व पुनर्वसन विभागाने उपरोक्त शेतक-यांसाठी कोणती कायमस्वरुपी उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे अशी समितीने विचारणा केली असता, यावर अतिरिक्त प्रधान मुख्य वन संरक्षक, महसूल व वन विभाग यांनी समितीस विदित केले की, मदत व पुनर्वसन विभागाने शेतक-यांना मदत देण्याबाबत दिनांक ५ मार्च २०१९ रोजी मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेतलेला आहे. कोरडवाहू क्षेत्र असेल तर ६८०० रुपये प्रती हेक्टर २ हेक्टर मर्यादेपर्यत मदत दिली जाईल. आश्वासीत सिंचन क्षेत्र असेल तर १३५०० रुपये प्रती हेक्टर २ हेक्टर मर्यादेपर्यत मदत दिली जाईल. शेतकरी बहुवार्षिक पीक घेत असेल तर १८ हजार रुपये प्रती हेक्टर २ हेक्टरपर्यत मदत दिली जाईल. याबाबत मंत्रिमंडळाने घेतलेला निर्णय सांगत आहे.

समितीने विचारणा केली की, मदत व पुनर्वसन विभागाने याबाबत सांगावे. यावर कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग यांनी समितीस विशद केले की, मार्च २०१९ मध्ये मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव आला होता. समुद्राला येणा-या भरतीमुळे जिवित हानी झाली तर मदत व पुनर्वसन विभागाकडून मदत देण्यात येते. शेतजमीन खारफुटी झाली असेल तर मदत देण्यासंबंधीचा निर्णय नव्हता म्हणून मंत्रिमंडळासमोर प्रस्ताव सादर केला होता. मंत्रिमंडळाने निर्णय घेतला की, कायमस्वरुपी सतत मदत न देता खारक्षेत्रात खार बंधारे बांधले तर कायमस्वरुपी प्रश्न संपुष्टात येईल. जलसंपदा विभागाने खार बंधारे बांधण्याचे ठरले व जलसंपदा विभागाने १०० कोटीची तरतूद करावी असा शासन निर्णय झाला होता. जलसंपदा विभागाला १०० कोटीची तरतूद करण्याबाबत कळविले होते. त्यांनी पुरक मागणी केली होती, त्यामध्ये १८ कोटी रुपये मंजूर झाले आहेत.

**अभिप्राय व शिफारशी**

रायगड जिल्ह्यामध्ये ओल्या दुष्काळाची परिस्थिती उद्‌भवल्याने शेती पिकांचे नुकसान होणे, समुद्राच्या उधानामुळे खाडी लगतच्या शेत जमिनीमध्ये समुद्राचे खारे पाणी घुसल्यामुळे शेती पिकाचे अतोनात नुकसान होणे, खा-या पाण्यामुळे शेत जमिन शेती करण्यास अयोग्य होणे इत्यादी बाबी तसेच त्याठिकाणी खारफुटी वने (मॅग्रोव्हज ट्री ) निर्माण होणे या परिस्थितीची पाहणी करण्याकरीता आलेल्या अहमदनगर विद्यापीठाच्या चमुस समुद्रालगतचे बांध वाहून गेल्याने शेतीचे नुकसान झाल्याचे तसेच तीच परिस्थिती सन १९९० मध्ये पुन्हा उद्‌भवून सर्व बांध वाहून गेल्याची वस्तुस्थिती समितीच्या निदर्शनास आली

बांधबंदिस्ती मुळे पूर्वी रायगड जिल्ह्यातील खार जमिनीचे नुकसान होत नव्हते मात्र हे बांध अतिवृष्टी व समुद्राच्या उधानामुळे वाहून गेल्याने त्याठिकाणी खारफुटी (मॅन्ग्रोज) निर्माण झाले आहे त्यामुळे शेतक-यांची हजारो एकर शेती नष्ट झाली आहे. जवळपास शेतक-यांची ३० ते ३५ हजार एकर जमीन यामध्ये अडकलेली आहे. पर्यावरण संरक्षणकरीता खारफुटीची वने नष्ट होऊ नये याकरीता सन २००० मध्ये पर्यावरणवादी एन.जी.ओ.ने मा. मुंबई उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केली असून सदरहू प्रकरण अद्यापही प्रलंबित असल्यामुळे तसेच या संदर्भात शासनाकडून कोणतीही ठोस भूमिका घेतली न गेल्याने शेतक-यांना त्यांच्या शेत जमिनीवर तयार झालेली खारफुटीची जंगले नष्ट करता येत नसल्याचे समितीच्या निदर्शनास आले. **सदरहू याचिकेअनुषंगाने शासनाने ठोस भूमिका घेऊन बाधित शेतक-यांच्या स्वतःच्या मालकीची खारफुटी वनाने व्याप्त शेत जमिन शेतीसाठी पुनःप्रापित होणेबाबत कार्यवाही व्हावी अशी समितीची शिफारस आहे.**

समुद्राचे उधान या स्थानिक नैसगिक आपत्ती प्रकरणी शासन निर्णय दिनांक ३० जानेवारी २०१४ नुसार केवळ जिवित हानी करीता मदत अनुज्ञेय असल्याचे तसेच या मुळे शेती पिकाचे नुकसान झाल्यास किंवा शेत कायमस्वरूपी नापीक झाल्यास मदत अनुज्ञेय नसल्याचे तसेच समुद्राच्या उधानामुळे किनारपट्टी भागातील शेतपिकांच्या नुकसानीकरीता राज्य शासनामार्फत मदत देण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेण्यासाठी अर्थसंकल्पीय तरतूदी मध्ये १०० कोटी इतक्या रक्कमेची वाढ करण्यात येणे तसेच यानुषंगाने जलसंपदा (खारभूमी ) विभागाने कामाचे नियोजन व अमंलबजावणी करण्याबाबत निश्चित करण्यात आले.

समितीसमोरील साक्षीदरम्यान विभागीय सचिवांनी दिनांक ५ मार्च २०१९ रोजीच्या मंत्रीमंडळाच्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार कोरडवाहू क्षेत्र असेल तर ६,८०० रूपये प्रती हेक्टर दोन हेक्टर मर्यादेपर्यंत मदत दिली जाईल. आश्वासीत सिंचंन क्षेत्र असेल तर १३,५०० रूपये प्रती हेक्टर दोन हेक्टर मर्यादेपर्यंत मदत दिली जाईल. शेतकरी बहुवार्षिक पिक घेत असेल तर १८,००० रूपये प्रति हेक्टर दोन हेक्टर पर्यंत मदत दिली जाईल. तसेच खार क्षेत्रात बंधारे बांधण्याकरीता जलसंपदा विभागाने १०० कोटीची पुरवणी मागणी केली असून त्यामध्ये १८ कोटी रूपये मंजूर झाल्याचे समितीच्या निदर्शनास आले. **यानुषंगाने वारंवार नुकसान भरपाई देण्याची गरज भासू नये तसेच कायमस्वरूपी उपाययोजना म्हणून अधिक मजबूत व टिकाऊ बांध बंधा-यांच्या बांधकामाकरीता अधिक भरीव आर्थिक मदतीची तरतूद करण्यात यावी,मंजूर झालेल्या रुपये १८ कोटी निधीच्या अनुषंगाने बंधा-यांची कामे पूर्ण करण्याकरीता तातडीने आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी, तसेच नुकसानीकरीता देण्यात येणा-या आर्थिक मदतीमध्ये वाढ करण्यात यावी आणि आर्थिक मदत देतांना दोन हेक्टरची मर्यादा निश्चित करण्यात आली आहे त्यामध्ये देखील वाढ करण्यात यावी, अशी समितीची शिफारस आहे.**

# परिशिष्ट

## समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त

**मंगळवार, दिनांक २३ ऑक्टोबर, २०१८**

**स्थळः जिल्हा परिषद सभागृह, अलिबाग**

**उपस्थिती :-**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख
(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.
(३) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.
(४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.
(५) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.
(६) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.
(७) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.
(८) श्री. किशोर पाटील, वि.स.स.
(९) श्री. तुकाराम काते, वि.स.स.
(१०) श्री. भारत भालके, वि.स.स.
(११) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.
(१२) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.
(१३) श्री. राहुल मोटे, वि.स.स.
(१४) श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.

**निमंत्रित सदस्य :-**

(१) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.
(२) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.
(३) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**स्थानिक लोकप्रतिनिधी :-**

श्री. सुभाष (पंडीतशेठ) पाटील, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव
(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव
(३) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी
(४) श्री. ह.वि.तामोरे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई :-**

श्री. संजय अनपट, सह संचालक

**स्थानिक पदाधिकारी :-**

(१) कु.आदिती तटकरे, अध्यक्ष, जिल्हा परिषद, रायगड

(२) ॲड.आस्वाद पाटील, उपाध्यक्ष, जिल्हा परिषद, रायगड

(३) श्रीमती उमा मुंढे, सभापती, महिला व बालकल्याण समिती, जिल्हा परिषद, रायगड

(४) श्री. प्रमोद पाटील, सभापती, कृषि व पशुसंवर्धन समिती, जिल्हा परिषद, रायगड

(५) श्री. नरेश पाटील, सभापती, शिक्षण, क्रीडा व आरोग्य समिती, जिल्हा परिषद, रायगड

(६) श्री. नारायण डामसे, सभापती, समाजकल्याण समिती, जिल्हा परिषद, रायगड

(७) श्री. सुरेंद्र म्हात्रे, विरोधी पक्षनेता, जिल्हा परिषद, रायगड

(८) श्री. अमित जाधव, सदस्य, जिल्हा परिषद, रायगड

(९) श्रीमती प्रियदर्शनी पाटील, सदस्य, जिल्हा परिषद, रायगड

(१०) श्रीमती चित्रा पाटील, सदस्य, जिल्हा परिषद, रायगड

**ग्रामविकास विभाग :-**

(१) श्री. गिरीष भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग

(२) श्री. प्रसाद गांगुर्डे, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग

**विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग :-**

(१) श्री. गणेश चौधरी, उपायुक्त (आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग

(२) श्री. नारायणसिंग परदेशी, सहाय्यक आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग

**जिल्हा परिषद, रायगड :-**

(१) श्री. अभय यावलकर, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. अंकुश चव्हाण, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. रामदास बघे, प्रभारी प्रकल्प संचालक

(४) श्री. निखीलकुमार ओसवाल, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)

(५) श्रीमती शितल पुंड, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)

(६) श्री. दत्तात्रय पाथरुट, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(७) श्री. विकास खोळपे, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(८) श्री. पुंडलिक साळुंके, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी पुरवठा व स्वच्छता)

(९) श्री. भाऊसाहेब थोरात, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(१०) श्रीमती शैलजा दराडे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(११) डॉ.सचिन देसाई, जिल्हा आरोग्य अधिकारी

(१२) श्री. प्रदिप भोसले, कार्यकारी अभियंता (बांधकाम)

(१३) श्री. संजय वेंगुर्लेकर, प्रभारी कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणीपुरवठा)

(१४) श्री. गजानन लेंडी, प्रभारी जिल्हा समाजकल्याण अधिकारी

(१५) डॉ.बंकट आर्ले, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१६) श्री. पुंडलिक साळुंके, प्रभारी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, अलिबाग

(१७) श्री. सी.पी.पाटील, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पेण

(१८) श्रीमती निलम गाडे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उरण

(१९) श्री. डी.ए.तेटगुरे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पनवेल

(२०) श्री. बी.एस.पुरी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कर्जत

(२१) श्री. संजय भोये, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, खालापूर

(२२) श्री. विनायक म्हात्रे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सुधागड पाली

(२३) श्री. प्रदिप पवार, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, रोहा

(२४) श्रीमती राजनंदिनी भागवत, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुरुड

(२५) श्री. नरेंद्र रेवंडकर, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माणगांव

(२६) श्री. विजय यादव, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तळा

(२७) श्री. वाय. एम. प्रभे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, म्हसळा

(२८) श्री. प्रविण सिणारे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, श्रीवर्धन

(२९) श्री. पी.बी.गोडांबे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, महाड

(३०) श्री. भुषण जोशी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पोलादपूर

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २०१३-२०१४ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदांबाबत व सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाबाबत साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक २४ ऑक्टोबर, २०१८**

**स्थळः जिल्हा परिषद सभागृह, अलिबाग**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

(३) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(४) श्री. रणधीर सावरकर, वि.स.स.

(५) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(६) डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.

(७) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(८) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(९) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

(१०) श्री. तुकाराम काते, वि.स.स.

(११) श्री. राहुल बोंद्रे, वि.स.स.

(१२) श्री. भारत भालके, वि.स.स.

(१३) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१४) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(१५) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

(१६) श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.

(१७) श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.

(१८) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य**

(१) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(२) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(३) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

(४) श्री. ह.वि.तामोरे, कक्ष अधिकारी

**ग्रामविकास विभाग :-**

(१) श्री. गिरीष भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग

(२) श्री. प्रसाद गांगुर्डे, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग

**विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग :-**

(१) श्री. गणेश चौधरी, उपायुक्त (आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग

(२) श्री. नारायणसिंग परदेशी, सहाय्यक आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग

**जिल्हा परिषद, रायगड :-**

(१) श्री. अभय यावलकर, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. अंकुश चव्हाण, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. रामदास बघे, प्रभारी प्रकल्प संचालक

(४) श्री. निखीलकुमार ओसवाल, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)

(५) श्रीमती शितल पुंड, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)

(६) श्री. दत्तात्रय पाथरुट, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(७) श्री. विकास खोळपे, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(८) श्री. पुंडलिक साळुंके, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी पुरवठा व स्वच्छता)

(९) श्री. भाऊसाहेब थोरात, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(१०) श्रीमती शैलजा दराडे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(११) डॉ.सचिन देसाई, जिल्हा आरोग्य अधिकारी

(१२) श्री. प्रदिप भोसले, कार्यकारी अभियंता (बांधकाम)

(१३) श्री. संजय वेंगुर्लेकर, प्रभारी कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणीपुरवठा)

(१४) श्री. गजानन लेंडी, प्रभारी जिल्हा समाजकल्याण अधिकारी

(१५) डॉ.बंकट आर्ले, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१६) श्री. पुंडलिक साळुंके, प्रभारी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अलिबाग

(१७) श्री. सी.पी.पाटील, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पेण

(१८) श्रीमती निलम गाडे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उरण

(१९) श्री. डी.ए.तेटगुरे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पनवेल

(२०) श्री. बी.एस.पुरी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कर्जत

(२१) श्री. संजय भोये, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, खालापूर

(२२) श्री. विनायक म्हात्रे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सुधागड पाली

(२३) श्री. प्रदिप पवार, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, रोहा

(२४) श्रीमती राजनंदिनी भागवत, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुरुड

(२५) श्री. नरेंद्र रेवंडकर, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माणगांव

(२६) श्री. विजय यादव, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तळा

(२७) श्री. वाय. एम. प्रभे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, म्हसळा

(२८) श्री. प्रविण सिणारे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, श्रीवर्धन

(२९) श्री. पी.बी.गोडांबे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, महाड

(३०) श्री. भुषण जोशी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पोलादपूर

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २०१३-२०१४ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदांबाबत व सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाबाबत साक्ष घेतली.

(शा.म.मु.) एचबी १९३९—७ (४५५—३-२०२१)

**गुरूवार, दिनांक २५ ऑक्टोबर, २०१८**

**स्थळः जिल्हा परिषद सभागृह, अलिबाग**

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. बाबुराव पाचर्णे, वि.स.स.

(३) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(४) डॉ. देवराव होळी, वि.स.स.

(५) डॉ. सुरेश (भाऊ) खाडे, वि.स.स.

(६) डॉ. सुधाकर भालेराव, वि.स.स.

(७) श्री. सुधाकर कोहळे, वि.स.स.

(८) श्री. भरतशेठ गोगावले, वि.स.स.

(९) श्री. किशोर पाटील, वि.स.स.

(१०) श्री. तुकाराम काते, वि.स.स.

(११) श्री. भारत भालके, वि.स.स.

(१२) श्री. दिलीप सोपल, वि.स.स.

(१३) श्री. राहुल मोटे, वि.स.स.

(१४) श्री. दिपक चव्हाण, वि.स.स.

(१५) श्री. प्रविण दरेकर, वि.प.स.

(१६) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य**

(१) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(२) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(३) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

(४) श्री. ह.वि.तामोरे, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई :-**

श्री. संजय अनपट, सह संचालक

**ग्रामविकास विभाग :-**

(१) श्री. गिरीष भालेराव, उप सचिव, ग्रामविकास विभाग

(२) श्री. प्रसाद गांगुर्डे, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग

**विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग :-**

(१) श्री. गणेश चौधरी, उपायुक्त (आस्थापना), विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग

(२) श्री. नारायणसिंग परदेशी, सहाय्यक आयुक्त, विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण विभाग

**जिल्हा परिषद, रायगड :-**

(१) श्री. अभय यावलकर, मुख्य कार्यकारी अधिकारी

(२) श्री. अंकुश चव्हाण, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(३) श्री. रामदास बघे, प्रभारी प्रकल्प संचालक

(४) श्री. निखीलकुमार ओसवाल, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)

(५) श्रीमती शितल पुंड, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)

(६) श्री. दत्तात्रय पाथरुट, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(७) श्री. विकास खोळपे, उप मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(८) श्री. पुंडलिक साळुंके, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी पुरवठा व स्वच्छता)

(९) श्री. भाऊसाहेब थोरात, शिक्षणाधिकारी (माध्यमिक)

(१०) श्रीमती शैलजा दराडे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(११) डॉ.सचिन देसाई, जिल्हा आरोग्य अधिकारी

(१२) श्री. प्रदिप भोसले, कार्यकारी अभियंता (बांधकाम)

(१३) श्री. संजय वेंगुर्लेकर, प्रभारी कार्यकारी अभियंता (ग्रामीण पाणीपुरवठा)

(१४) श्री. गजानन लेंडी, प्रभारी जिल्हा समाजकल्याण अधिकारी

(१५) डॉ. बंकट आर्ले, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(१६) श्री. पुंडलिक साळुंके, प्रभारी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अलिबाग

(१७) श्री. सी.पी.पाटील, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पेण

(१८) श्रीमती निलम गाडे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, उरण

(१९) श्री. डी.ए.तेटगुरे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पनवेल

(२०) श्री. बी.एस.पुरी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कर्जत

(२१) श्री. संजय भोये, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, खालापूर

(२२) श्री. विनायक म्हात्रे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, सुधागड पाली

(२३) श्री. प्रदिप पवार, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, रोहा

(२४) श्रीमती राजनंदिनी भागवत, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुरुड

(२५) श्री. नरेंद्र रेवंडकर, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, माणगांव

(२६) श्री. विजय यादव, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, तळा

(२७) श्री. वाय. एम. प्रभे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, म्हसळा

(२८) श्री. प्रविण सिणारे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, श्रीवर्धन

(२९) श्री. पी.बी.गोडांबे, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, महाड

(३०) श्री. भुषण जोशी, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पोलादपूर

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने रायगड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर सर्व संबंधित अधिकारी यांची सन २०१३-२०१४ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेदांबाबत व सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवालाबाबत साक्ष घेतली.

**बुधवार, दिनांक २८ ऑगस्ट,२०१९**

स्थळ : विधान भवन, मुंबई

**उपस्थिती :**

(१) श्री. सुधीर पारवे, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. चरण वाघमारे, वि.स.स.

(३) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य :**

(१) श्री. बाळाराम पाटील, वि.प.स.

(२) श्री. श्रीकांत देशपांडे, वि.प.स.

(३) श्री. दत्तात्रय सावंत, वि.प.स.

(४) श्री. किशोर दराडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. प्रकाशचंद्र खोंदले, अवर सचिव

(३) श्री. मंगेश पिसाळ, कक्ष अधिकारी

(४) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी

**स्थानिक निधी लेखापरीक्षा संचालनालय, नवी मुंबई**

श्री. सु.रा.भोसले, संचालक

**विभागीय सचिव**

(१) डॉ. प्रदिप व्यास, प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग

(२) श्री. अनिल डिग्गीकर, प्रधान सचिव, पर्यावरण विभाग

(३) श्री. वीरेंन्द्र तिवारी, अतिरिक्त प्रधान मुख्य वन संरक्षक, महसूल व वन विभाग

(४) श्री. एन.वासुदेवन, अतिरिक्त प्रधान मुख्य वन संरक्षक, वन कक्ष

(५) श्री. र.अ.नागरगोजे, उप सचिव, ग्रामविकास विभाग (श्री. असिमकुमार गुप्ता, प्रधान सचिव यांचे प्रतिनिधी)

(६) श्री. राजेंद्र पवार, उप सचिव (प्रतिनिधी) शालेय शिक्षण विभाग

(७) श्री. प्र.आ.पाटील, अवर सचिव, शालेय शिक्षण विभाग

(८) डॉ. विजय भुंदेवाड, सहसंचालक, आरोग्य सेवा संचालनालय

(९) श्री. शरद यादव, कक्ष अधिकारी, ग्रामविकास विभाग

(१०) श्री. उदय गवस, कक्ष अधिकारी, महसूल व वन विभाग जिल्हा परिषद, रायगड

(११) श्री. दिलीप हळदे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड

(१२) श्री. रणधीर सोमवंशी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी

(१३) श्री. निखीलकुमार ओसवाल, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि)

(१४) श्री. दत्तात्रय पाथरुट, मुख्य लेखा व वित्त अधिकारी

(१५) श्री. पुंडलिक साळुंखे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग)

(१६) डॉ. सुधाकर मोरे, जिल्हा आरोग्य अधिकारी

(१७) श्री. जी.एम.लेंडी, जिल्हा समाजकल्याण अधिकारी

(१८) श्री. लक्ष्मण खुरकुटे, कृषि विकास अधिकारी

(१९) डॉ. के.बी.आर्ले, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी

(२०) श्रीमती शीतल पुंड, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रामपंचायत)

(२१) श्री. एन.जी मंडलिक, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (बालकल्याण) तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक)

(२२) श्री. राजेंद्र कोळी, कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणीपुरवठा विभाग

(२३) श्री. विकास खोळपे, उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन २०१३-२०१४ च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवाल व सन २०१४-२०१५ च्या वार्षिक प्रशासन अहवाल या संदर्भात रायगड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या संदर्भात अधिक माहिती मिळविण्यासाठी प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, प्रधान सचिव, पर्यावरण विभाग, उप सचिव, ग्रामविकास विभाग, उप सचिव, शालेय शिक्षण विभाग, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड, मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, रायगड, सह संचालक, आरोग्य सेवा संचालनालय यांची साक्ष घेतली.

**बैठकीचे कार्यवृत्त**

पंचायत राज समिती (Panchayati Raj Samiti)ची बैठक बुधवार, दिनांक ०३ मार्च, २०२१ रोजी ०३:०० वाजता, विसावा मजला, कक्ष क्र. २००१, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते :–

**उपस्थिती :**

(१) श्री. संजय रायमुलकर, वि.स.स. तथा समिती प्रमुख

(२) श्री. अनिल पाटील, वि.स.स.

(३) श्री. संग्राम जगताप, वि.स.स.

(४) श्री. शेखर निकम, वि.स.स.

(५) श्री. सुभाष धोटे, वि.स.स.

(६) श्री. माधवराव जवळगावकर पाटील, वि.स.स.

(७) श्रीमती प्रतिभा धानोरकर, वि.स.स.

(८) श्री. कृष्णा गजबे, वि.स.स.

(९) श्रीमती मेघना साकोरे बोर्डीकर, वि.स.स.

(१०) श्री. किशोर जोरगेवार, वि.स.स.

**विशेष निमंत्रित सदस्य**

(१) श्री. किशोर आप्पा पाटील, वि.स.स.

(२) श्री. किशोर दराडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. रंगनाथ खैरे, अवर सचिव (समिती)

(३) श्री. ह. वि. तामोरे, कक्ष अधिकारी

(४) श्रीमती सुषमा लोंढे, कक्ष अधिकारी

**संक्षिप्त कार्यवृत्त :-**

समितीने बैठकीत आठव्या अहवालाच्या प्रारुपावर विचार करुन किरकोळ दुरुस्त्यांसह संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई